सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळ

SAN ANTONIO MAHARASHTRA MANDAL

# दिवाळी अंक २०२२

# Diwali Ank 2022



***सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळ***
***दिवाळी अंक २०२२***
***अंक क्रमांक - ३***

***San Antonio Maharashtra Mandal***
***Diwali Ank 2022***
***Serial Number- 3***

***संपादक:***
*श्री. लक्ष्मीकांत चंद्रकांत बोन्द्रे*

***सहाय्य:***
*सौ. रेश्मा निखिल गोरेगावकर*
*सौ. नुपूर कर्णिक*

***मुखपृष्ठ चित्रकला:***
*सौ. तेजश्री सौरभ मगदूम*

**Disclaimer:**
The views and opinions expressed in this SAMM Diwali Ank 2022 are those of the authors and do not necessarily reflect the official policy or position of San Antonio Maharashtra Mandal. None of the content is intended to malign any religion, ethnic group, club, organization, company, individual or anyone or anything in particular.

# ॥ श्री गणेश ॥




चित्रकार: सौ. तेजश्री सौरभ मगदूम

# संपादकीय

मित्रांनो!!
तुम्हा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.
हा हा म्हणता वर्ष २०२२ सरत आले,
खूप साऱ्या आठवणी देऊन गेले.

आता, मंडळातील सर्व साहित्यिकांना, चित्रकारांना एकत्र जोडणारा दुवा म्हणजे आपला मंडळाचा दिवाळी अंक घेऊन आले!!!

परिवार एकत्र जोडला जातो तो विविध धाग्यांनी! दरवर्षी आपण या कर्म भूमीत आपले सण, समारंभ अगदी निगुतीने आणि साग्रसंगीत प्रकारे साजरे करतो. त्यासाठी सर्व जण एकत्र येऊन जोमाने, उत्साहाने कामाला लागतात. देशापासून सर्वजण दूर असूनही जशी जमेल तशी परंपरा जपण्याचा आणि ती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. याच परंपरेचा एक भाग म्हणजे दिवाळी अंक, त्याशिवाय आपली दिवाळी अपूर्ण वाटते.

आपल्या महाराष्ट्र मंडळाने दोन वर्षांपूर्वी ही दिवाळी अंकाची परंपरा जपण्यासाठी आणि लोकांमधल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हा एक कलामंच उघडा करून दिला. आता दिवाळी आली की आपल्या मंडळातले साहित्यिक, चित्रकार, आणि कवी सर्वच जण लेखणी सरसावून पुढे होतात आणि मग त्यांच्या लेखणीतून बरसलेली सुवासिक फुले आपल्या फिंगर टिप्स वर येतात ती, ई-दिवाळी अंकातून आणि त्या फुलांचा मंद सुवास वर्षभर दरवळत राहतो. यंदा आपल्या दिवाळी अंकाचे हे तिसरे वर्ष! कमिटीने यावर्षी या अंकाच्या संपादकाची धुरा माझ्यावर सोपवली. यासाठी मी सर्व प्रथम कमिटीचे आभार मानतो.

या अंकाचे काम करताना माझा मंडळातील व काही मंडळाबाहेरील लोकांशी संबंध आला आणि मीच समृद्ध होत गेलो. जसे फराळाने भरलेले गच्च ताट बघून काय खाऊ आणि काय नको असे होते, तुमचेही अगदी या साहित्यिक फराळाच्या बाबतीत होणार आहे हे नक्कीच!!

आपल्या मंडळातल्या सर्व चित्रकारांनी / लेखकांनी / कवींनी या अंकात आपले साहित्य पाठवण्यासाठी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला त्याबद्दल त्यांचे आभार. या अंकातील मुलाखती वाचताना आपल्याला या सर्व गुणी मराठी लोकांचा नक्कीच अभिमान वाटेल.

हा अंक फक्त मोठ्यांसाठीच नसून मुलांसाठीही यात मुल्लांनी लिहिलेले अनेक लेख आहे आणि गमतीशीर मराठी कोडी आहेत आणि हो कोडी सोडवायला वयाचे बंधन नसतेच मुळी .....

चला तर मग! आम्ही आशा करतो की हा अंक तुमचे भरपूर मनोरंजन करेल आणि हो, हा अंक ई-दिवाळी अंक आहे, तेंव्हा हा अंक तुम्ही जगात कोणाकडेही पाठवू शकता.

तसेच तुम्हांला कोणाचा लेख / कविता / कोडे / मुलाखत आवडली तर त्यांना personal message करून जरूर कळवा आणि आनंद द्विगुणित करा!!

मुख्य म्हणजे, चूकभूल द्यावी घ्यावी. भेटूच लवकर .....

धन्यवाद.



**संपादक:**
**श्री. लक्ष्मीकांत चंद्रकांत बोन्द्रे**

# कार्यकारिणीचे मनोगत




**डावीकडून-उजवीकडे:**
**सौ. रश्मी सरलष्कर (खजिनदार), सौ. रसिका घवघवे (अध्यक्ष),**
**सौ. रेश्मा गोरेगावकर (उपाध्यक्ष-उपक्रम),**
**सौ. नुपूर कर्णिक (उपाध्यक्ष-संपर्क), श्री. मिहीर चौधरी (सचिव)**

प्रिय SAMM परिवार,

तुम्हा सर्वांना SAMM तर्फे दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा! तुमची दिवाळी छान साजरी झाली असेल आणि चमचमीत फराळाचा आस्वाद तुम्ही नक्कीच घेतला असेल! दिवाळी हा सण आपल्या सगळ्यांचा आवडता आहे! हा सण आला की लहानपणीच्या सगळ्या आठवणी जाग्या होतात - आईची फराळ बनवायची लगबग, नवीन कपडे खरेदी करण्याची मजा आणि बाबांनी आणलेले फटाके फोडायला जाणे! किती छान होते ते दिवस! अजूनही अभ्यंगस्नान आणि उटण्याचा सुवास मनात दरवळतो!

तीच परंपरा पुढे नेण्यासाठी आणि आपल्या मुलांनाही ह्या गोष्टी अनुभवता येण्यासाठी इथे ही आपण दिवाळी जमेल तितक्या पारंपारिक रीतीने साजरा करतो! नाही म्हंटलं तरी, गेल्या दोन वर्षात पँडेमिकमुळे आपल्याला सण साजरा करण्याचं महत्व कळले! सॅन अँटोनियोतले रहिवासी तर खूप भाग्यवान आहेत, कारण त्यांना तीन-तीन दिवाळ्या साजऱ्या करायला मिळतात - IASA दिवाळी, City दिवाळी आणि SAMM दिवाळी! आपण सर्व ह्या सगळ्या दिवाळ्या अगदी उत्साहाने आणि जोशात साजऱ्या करतो!

SAMM कमिटीचा हाच प्रयत्न असतो की प्रत्येक सणाचा आनंद तुम्हाला उपभोगता यावा मग ते मकर संक्रांतीचा वाण असो, गुढी पाडव्याचा सण असो वा गणेशोत्सव असो! या वर्षभरात आम्ही तुमच्यासाठी किती वेगवेगळे कार्यक्रम घेऊन आलो! ह्या वर्षीची एकदम वेगळी दिवाळी ही तुम्हाला आवडली असेलच हीच आशा बाळगतो!

तसं बघायला गेलो तर जरी इव्हेंट एक दिवसाचा असला तरी त्याची तयारी कित्येक महिन्यांपूर्वीच सुरु होते, बरं कां! कार्यक्रमासाठी जागा शोधणे, त्यानुसार जेवणाचं प्रयोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि अशा बऱ्याच लहान मोठ्या गोष्टी! म्हणूनच आम्ही पूर्वीच्या समितीचे सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याचे आभार मानतो व सगळ्या सदस्यांचेही आभार मानतो! तुम्ही सगळे अगदी उत्साहाने आणि तत्परतेने volunteering करायला तयार होता, हेच कार्यक्रमाच्या यशाचे कारण आहे! अशाच प्रकारे पुढची अनेक वर्षे तुम्ही SAMM च्या पाठीशी उभे राहाल अशी आमची खात्री आहे.

आमची इच्छा आहे की सगळेच सदस्य SAMM च्या कार्यक्रमात हर्षोल्हासाने सहभागी होतील आणि आपल्या कम्युनिटीला एकत्रित ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न करतील! 'आपण एक मोठा परिवार आहोत' हीच भावना आपण आपल्या भावी पिढीतही रुजवू शकतो आणि सॅन अँटोनियोला “home away from home” बनवू शकतो!

येणाऱ्या २०२३ वर्षासाठी आम्ही खूप उत्साहित आहोत कारण सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळाला ५ वर्ष पूर्ण होत आहेत!! त्यासाठी आम्ही नक्कीच काहीतरी special करू! सुरुवातीला SAMM मध्ये फक्त ३० च्या आसपास परिवार होते आणि आम्हांला हे कळवण्यात आनंद होत आहे की आता SAMM ने शतक ओलांडले आहे! तेव्हा पुढच्यावर्षीची मेम्बरशिप ही नक्की घ्या आणि नवीन कार्यक्रमांचा आस्वाद मिळवा! तुमचे काही suggestions / feedback असतील तर ते samaharashtramandal@gmail.com वर नक्की पाठवा!

दरवर्षीच्या प्रत्येक कार्यक्रमात सुधारणा करून तुमच्या समोर मनोरंजक आणि सांस्कृतिक पद्धतीने प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करू हीच इच्छा! पुन्हा एकदा तुम्हा सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा आणि ही दिवाळी तुम्हाला सुख-समृद्धी आणि उदंड आयुष्य प्रदान करो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**आपली,**
**SAMM Committee २०२२-२०२३**

# गणपती बाप्पा मोरया

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या

माझ्या लहानपणी मी अशा आजीची नात होते की तिला फार मोठी कलाकार समजायला हवी. त्या काळात स्त्रीया ऑफिसात नोकरी करू शकत नव्हत्या की इंग्रजी कुठही वाचू शकत नव्हत्या. आजची स्त्री नोकरी करून संसाराला हातभार लावते, म्हणून तिचे कौतुक होते. संसाराची जबाबदारी ती अर्धी घेते.

पण माझी अशिक्षित आजी देखील तिच्या संसाराचा भार थोडा कमी का होईना वाहत होती. कुठून आणि कसं कोण जाणे? ती गणपती करायला शिकली होती व घरात बसून ती मोठमोठे गणपती करत असे. हा धंदा तिने सुरू केला व आम्हालाही शिकवला. आमच्या लहानपणी ~~[illegible]~~ तो आम्ही केला - असेल ५० वर्षे तो करत होतो. हा धंदा वाटतो तितका सोपा नाही. आपला वयपरत्वे तो होत नाही - हात, डोकं चालत नाही - शिवाय वाटत नाही ८/१० माणसे तरी गणपतीच्या मोसमात लागतात. आम्ही मुलांच्या व काका वडिलांच्या मदतीने तिने तो केला. तिच्या मुळे मी पण करत असे.

साधारण आषाढाच्या शेवटला आम्ही माती आणत असू. ह्या ढिगाऱ्यावर रोज पाणी शिंपडून ती मळत असू. मग मातीचा गोळा झाला की साच्यात भरून त्याला दोरी लपेटत असू. हा साचा पाटावर ठेवून मोकळा करत असू. हे गणपतीचे धड होत असे. हात, डोकं ह्याचे साचे वेगळे असतात. ते वेगवेगळे करून धडाला जोडायचे. सोंड मात्र हाताने करावी लागून जोडावी लागत असे.

पण ह्या सगळ्या कामाची मुख्य कलाकार, ती २०११ होती माझी आजी! ती मोठ्या मोठ्या मूर्ती हाताने

आता सोहळ्याच्या मूर्ती. त्या 'विकण्याकडे' वडिल व काका वळत. सगळा माल विकता विकता थकवा येत असे. पण खूप मजा येई. गणपतीच्या आदल्या दिवशी व त्या दिवशी तर खूप मजा येई. कोणी वाजंत्री घेऊन येई, तर कोणी पालखी. नाचगाण्याने सारे अंगण दुमदुमून जाई आणि ~~श्र~~ परिश्रमांचा परिहार होई.

हे सर्व लहानपण बडोदा शहरी - गायकवाडांचं राज्य होतं तिथे मी घालवले. आता राहिल्यात त्या फक्त आठवणी. आमची जास्त गिऱ्हाईकं सी.के.पी. होती. पण इतके सर्व जात की आम्ही शोध घेत असू आमच्याकरता कोणता गणपती राहिला? आणि कुठे तरी एक छोटासा गणपती राहिलेला असे. मग पुढे डेकोरेशन आणि पुढे काय? आमचा गणपती देवाच्या देव्हाऱ्यातच पुजला जाई. पूजा, नैवेद्य सर्व काही सोवळ्यात होई. पण आज[illegible] आहे, मूर्तीचा नाही. कारण [illegible] म्हणतात ना पिकतं तिथे विकत नाही व मिळतही नाही.

**लेखिका: स्व. सौ. सरोज गुप्ते**

*This article was written by Late Mrs. Saroj Gupte (Mr. Shirish Gupte's mother) , an educator, and a great orator who was head of Marathi division in Kalina Education High School in Mumbai. She had a Masters in Marathi from University of Mumbai. (Bombay University then). She was a passionate Marathi teacher who was loved by everyone in her school, family and friends. Teaching Marathi to under-privileged students after school hours, without charging tuition fees, was one of the examples of her dedication, generosity and love towards Marathi literature.*

*This piece was written by her to commemorate her close friend, Mrs. Shalan V. Pradhan's life experiences of making Ganapati idols. It also helped her students understand the challenges people faced to create and sell Ganapati idols during Ganapati festival in old days.*



# In Conversation with Architects: Mrs. Manjiri & Mr. Gopinath Akalkotkar

**Please tell us about both your backgrounds and academic aspirations.**

**Manjiri:** I am registered Architect in the state of Texas. Completed my bachelors in architecture in Pune and master's degree in architecture studies in UT Austin.

**Gopi:** I grew up in Ahmedabad. Went to one of the best Architecture Colleges in India. During my third year, I got a chance to go to Switzerland on an exchange program scholarship. I explored Europe during that time. Then after graduating, I got my first job in Zurich due to the Swiss connections I had made. The company I worked for had opened up and office in New York. They sent me to New York. I worked there for 5 years and got my green card. I married Manjiri and brought her to NY from Pune. After getting our green cards, I always had the aspiration to do my Masters. I came to UT Austin in 1995 and did a 2-year masters and then came to San Antonio to work. I worked on many large Institutional projects with a couple of companies. I also got to travel the world working on Air Force housing master plans. We had 2 children in 1998 and 2001. I got a chance to work in Ahmedabad in 2009 with an American company. We moved to Ahmedabad with our 7 and 10 year old children. I worked for this company for six years. We decided to move back to the US for children's colleges in 2015.I left that job and took a job with an Indian company to set up their architectural business in Pune and do business development for them in the US. I essentially commuted from San Antonio to Pune for about 4 years. Then I decided to stop this International travel and I became the City Architect of San Antonio. I enjoyed that job for 2 years. Then recently I was offered to start up a branch of a successful DFW based company that designs Schools. So now I am head of this branch and enjoying this work.

**Please share some insights on the type of work that you both specialize in.**

**Manjiri:** I work for VIA Metropolitan Transit as Vice President of Program Delivery. My experience and expertise is in 1. Transit Route Planning and Scheduling (Allocations - of vehicles and operators to transit routes) 2. Transit Capital Projects Planning and Delivery.

**Gopi:** I am a generalist architect who has evolved into running the business of architecture. I now have experience in many different types of projects and all aspects of running large Architectural businesses - from technical work to HR, accounting, marketing, and business development. I started working on small projects, but for many years now, I have only worked on very large ones.

**How has been your professional experience in the US? How different is it from your experience in India?**

**Manjiri:** I have worked for small private architecture firms in India and USA in the first decade of my career. That experience was similar with exception of dealing with building permits and inspection. Indian municipality procedures are not clearly stated and followed while USA processes are much more streamlined. I have taught in both countries and found teaching in CEPT was more practice oriented than in UTSA. I worked on major transit projects in both countries- INDIA is very weak in assessing and mitigating environment and social impacts than USA while projects are completed in shorter time in INDIA.

**Gopi:** I have worked with private and public entities in India and the US. I have found that the private entities in the US have better business ethics than in India. Although I must say that I found the best clients in Mumbai and Bangalore compared to Gujarat and New Delhi. Government work has its own challenges in both countries. In the US, the main problem is that things go very slow in Government contracts. It was little challenging working in India on Government projects.

**What recommendations could you share for students who would like to make a career in architecture?**

**Manjiri:** It's a five-year degree and lot of assignments outside classroom. Be prepared for tackling humanities and technical courses. Unlike India where you can be registered to practice Architecture upon graduation, USA has a licensing examination which is difficult. Pay is much less than Engineering graduates.

**Gopi:** Architecture is a hard profession anywhere in the world. The schools teach you to come up with lofty and impractical ideas, whereas the reality of the work is very different. You have to be lucky and work really hard to become successful. Although there are a lot of different opportunities to branch out into becoming project managers, construction managers, facilities managers, etc.

**What do you say to influence new generations towards Indian Culture?**

**Manjiri:** While my जन्मभूमी is India, my कर्मभूमी is USA. I am equally proud of both. Be comfortable and proud in your own heritage, culture but respect local people, culture and community. Take best of both worlds and find your own path. Serve the local community and be part of it while sharing your culture and history with others. I serve on various organizations/ committees professionally and enjoy sharing knowledge/ information about my cultural heritage and India.

**Gopi:** I believe that I am a global citizen and have been comfortable in any situation I find myself in. I tell my children to be proud of who you are and our heritage. I used to be shy about showcasing our clothes or customs when I came to the west as a young person, but now I feel very comfortable in what I am and what I do. So, I tell my children to blend in the society where they are living, but be comfortable introducing our music, culture, food, and language to others as well.

# गृहीणी की गृहीत धरलेली?......

आमटीला उकळ काढता काढता, भरभर पोळ्या लाटता लाटता,

अन एकीकडे कूकरच्या शिट्ट्या मोजता मोजता .....

ती दुसऱ्या कानाने मालिकेतले संवाद ऐकत असते.

मनोमन सुखावते .....

जेंव्हा सुनेच्या मागे लाड करत फिरणारी सासू बघते .....

"अगं डबा घेतलास का?, मोबाईल ठेवलास का?, आणि आज काय उशिरापर्यंत मीटिंग आहे, काळजीच नको, मी सर्व जेवण करून तयार ठेवते .....

तू आलीस की जेवू मस्त पुरण पोळीचा बेत."

हे सर्व बघून हिची आमटी जरा जास्तच उकळते;

पोळी भाजताना काळीच पडते .....

मनात म्हणते .....

सासूही बघतेच आहे की सिरीयल मधल्या सासूला, अगदी निवांत .....

आज निदान दखल घेतली गेलीय सिरीयल मधल्या सुनेची आणि .....


आपलीही घेतली जाईल अशीच दखल एकेदिवशी .....

या आशेवर पुढची कूकरची शिट्टी मोजते.

**लेखिका - सौ. संध्या लक्ष्मीकांत बोन्द्रे**

# वारली चित्रकला









चित्रकार: सौ. चारुता देशपांडे भागवत

# आम्ही किती आधुनिक झालोय?

"साडी नको, जीन्स घालून जा बरं का, म्हणजे मॉडर्न साड्या दाखवतील!" शॉपिंगला जाताना माझी जाऊ सांगत होती. साडी जीन्स आणि विकायची गोष्ट यांचा एकमेकांशी संबंध काय हे लक्षात येईना. "बहेनजीला ते तशाच साडया दाखवतात." म्हणजे काठा पदराची साडी नेसून बाई दुकानात आली की बहेनजी आली आणि आधुनिकपणाच्या कल्पनांमध्ये बराच बदल झाल्याचं लक्षात आलं.

मुंबईसारख्या दमट हवेच्या शहरात केवळ आधुनिक व्हायच्या हौशीपायी घट्ट जीन्स आणि पॉलिस्टर टॉप्स घालणाऱ्या मुलींना पाहिले की त्याच्या सहनशीलतेचं कौतुकमिश्रित आश्चर्य वाटतं. भारताच्या गरम हवेच्या भागांमध्ये अशा पेहेरावामुळे तयार होणाऱ्या शारीरिक समस्या कशा दुर्लक्षित होतात? साडी, आणि सलवार-कमीज सारखे पोशाख ह्या गोष्टीचा विचार करून ठरवल्या गेल्या बहुतेक. जसा देश तसा वेष बरोबर असावं.

आपल्याकडे पिझ्झा, बर्गर, पास्ता इ. अगदी सर्रास खाण्यात येऊ लागलाय. केवळ पाश्चात्यानुकरण आणि बघा, त्या देशांमध्ये लोक जास्तीत जास्त "व्हिगन" होताहेत. शाकाहारी होताहेत. आहे की नाही गम्मत!! तेथे भाज्यांचे सेवन, डाळी जास्तीत जास्त खा असं जोरात सांगितलं जातंय. आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपला आहारच बदलत आहोत. मुलांची वजनं बेसुमार वाढताहेत हा विचार आपण करतोय? ह्याचे दूरवरचे परिणाम आपल्याला दिसत नाहीत का?

रोज संध्याकाळी एकत्र येऊन प्रार्थना करायची पध्दत आता गेलीच. 'सेटल' होऊन शांतपणे जेवायचे यातली मजाच गेली. फोनवर सगळं लक्ष त्यामुळे ते विचार प्रामुख्याने पोटात जातात. अन्न आपलं नाइलाज म्हणून. अन्नाची किंमतही उरत नाही; शरीरालाही, मनालाही.

परंपरा तयार झाल्या त्या काळानुसार, परिस्थितीनुसार. मग या काळातही तितक्याच पाळल्या जाव्या का? ही विचार करण्यासारखी गोष्ट. बायकांना देवदर्शनाला जायला काही बंधनं होती ती याही काळात पाळणं किती शक्य, किती योग्य हा विचार मांडावासा वाटतो. ह्या सर्वांत 'देवाचा' किती हात आहे? उपासतापास जोरांत चालू झालेत. स्वत:वर ताबा मिळवणे हा हेतू असला तर गोष्ट वेगळी पण देवाशी वाद होत असले तर?

गणपतीउत्सव, नवरात्र साजरे होतात. अगदी जोरात. कडक उपासतापास, रोज वेगळ्या रंगाची साडी वैगेरे. हे सगळं अगदी मजा म्हणून जरुर करूया. पण त्याबरोबर देवीच्या ह्या स्फुर्तीदायक अवतारांची आपण वर्षभर आठवण ठेवतो का? आत्मसंरक्षणाची वेळ आपण किती सामर्थ्याने निभावून नेऊ शकू? त्याकरिता आपण ते धडे घेतले आहेत का? गणपतीचे सुपाएव्हढे कान घेऊन आपण दक्ष होऊन वावरत नसतो. त्याच्या सोंडेसासारखा आपल्या नाकाचा उपयोग फक्त चांगुलपणा शोधण्यात करतो का? त्याची बुद्धि घेऊन नीरक्षीर विवेक करण्याचं विसरूनच जातो. थोडक्यात काय! तर हे सर्व देवीदेवतांचे उत्सव अत्यंत आनंदात, थाटात साजरे करूयात. पण नंतर त्यांचे गुण मात्र आत्मसात करण्याचा प्रयत्न सातत्याने व्हायला हवा. तर ती खरी पूजा.
आधुनिक काळात आपण मनाने, शरीराने आणि विचाराने खरोखर आधुनिक व्हावं नाही का?

ह्या विचारांच्या मागे माझा कोणाहीवर टीका करायचा उद्देश नाही. पण या सर्व प्रश्नांची उत्तरे आपली आपणच आपापल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार शोधायची आहेत. आपण खूप शिकतो, परंपरा जपतो, उत्सव करतो. त्यातली मजा, आनंद तर घ्यायचाच. पण त्याबरोबरच याचा उपयोग सतत आपली व्यक्तिगत उन्नती करण्यात केला तर खरे आधुनिक. नाहीतर नावापुढली पदव्यांची बिरुदावली फक्त अल्फाबेट सूप होऊन बसेल.

लेखिका: सौ. माधुरी राजेंद्र कुलकर्णी

# The Scouting Journey to Excellence

As a parent of a scout and a leader for over 15 years, I would like to talk to you all today about how Scouting helps nurture character development in our kids. I have held various positions in scouting, ranging from a parent bringing their kid to scout meetings to a den leader, cubmaster and Troop Committee Chairman. I am proud of my two sons who have undertaken the scouting journey.




Our elder son, Parth is an Eagle Scout and Mihir is well on his way to earning his Eagle rank.
I mention all this so as to not seem to be preaching about the virtues of scouting without walking the walk. Now that we have this out of the way, it is time for me to start my sermon about how scouting helps build the character in our young ones. Just kidding!



The goal of this article is to help you all think about scouting as one of the avenues of growing our kiddos. Scouting helps youth develop academic skills, self-confidence, ethics, leadership skills, and citizenship skills that influence their adult lives. In addition, scouting provides youth with an opportunity to try new
things that ordinarily does not come by if you are not in the program. These opportunities not only help them when they are young but also carry forward into their careers and business ventures.

In Scouting, youth learn through the experiences of camping, hiking, building projects and community service. These experiences allow youth to grow and mature at their own pace. Some activities help Scouts think about how they can make the right choices in their everyday lives.




The Cub Scout motto - Do Your Best - serves as a guide for their actions in working with others. As youth, Scouts are taught to live by a code of conduct exemplified in the 12 points of the Scout Law - Trustworthy, Loyal, Helpful, Friendly, Courteous, Kind, Obedient, Cheerful, Thrifty, Brave, Clean and Reverent and they continue to live by these laws in adulthood.

That being said, our San Antonio Indian Community has very good options of enrolling their kids into the scouting program. The cub scout program that runs from Grade 1 to Grade 5 is hosted by Cub Scout Pack 1947. This pack is chartered by the India Association of San Antonio. The Boys Scout of America (BSA) scouting program from Grade 6 through Grade 12 has two popular options for the scouts - Troop 515 hosted in the Stone Oak Area and Troop 401 in the Helotes Area.




These programs have helped our scouts develop some of the core skills like First Aid, Emergency Preparedness, Citizenship and others. Scouts and parents have developed awareness of all the things that the great state of Texas has to offer. The Texas State Park system has provided ample camping opportunities for our scouts. We still fondly remember our overnight stays on USS Lexington and Battleship Texas. Scouts have developed their marketing skills and perseverance while selling popcorn during the winter months outside stores like Bass Pro Shops and Lowe's to raise money for their scouting activities. I personally remember taking our little scout's door to door selling popcorn and seeing their faces light up when they make a successful sale.



Scouts learn about sports, crafts, science, trades, business and future careers through the merit badge program. I can vouch that earning these merit badges helped our sons become proficient in cooking. We have spent quite a few evenings enjoying food cooked by our scouts at home.

For the past 15 years, I have seen numerous scouts work through these programs and achieve the Eagle rank. It has been a very fulfilling experience for us to see a shy 6-year old afraid to say their name in front of an audience come out of their shell and run an Eagle project as a Life Scout. Completing an Eagle project requires the scout to envision a service project, complete a proposal, execute it and present a final report to the Eagle Board. This final step in the scouting journey helps the scout hone their leadership skills. These soft skills are key to enhancing their career and/or their business acumen.

**As the scouting motto goes - Be prepared and do your best.**

**Author: Mr. Sandesh Ghawghawe**

# दिवाळी फराळ - कोडे



दिवाळीचा फराळ, काय त्याचा थाट!!
आता खाऊन झाला आहे फस्त,
फराळाची नावे सांगा मस्त....



१. चव माझी गोड, मी आहे चंद्रासारखा गोल आणि रंग माझा गोरा, आबालवृध्द सर्वांचा मी लाडका, म्हणूनच आहे माझा तोरा!!

२. वेटोळे घालून मी बसते, आहे तिखट चवीची, काटेरी कुरकुरीत तरी सर्वांच्या आवडीची.

३. देवाचे नाव आहे माझ्या नावात, कधी गोड कधी तिखट, फराळाच्या ताटात मला नाही विसरत.



४. चंद्रकोरीचा आकार मिरवते मी दिमाखात, लपली आहे गोड़ माया खुसखुशीत पदरात.

५. बारीक, लांब जणू मॅगीचे नूडल तिखट, येता जाता तोंडात टाकता संपतात पटपट.



६. कोणी करती सात पदरी कोणी आठ पदरी,तोंडात घालताच विरघळणारी माझी चवच न्यारी.



७. सुक्या भेळेचा आहे मी भाऊ, पोहयांसोबत शेंगदाणे, कुरमुऱ्यांचा खाऊ.

८. सूर्यासारखा गोल, पिवळा माझा रंग, आणि तीळ शोभतो गालावर, फराळासोबत रोजच्या खाऊच्या डब्यातही लागतो माझा नंबर.

९. मी आहे खुसखुशीत, गोड़ चवीचा, भरपूर तूप पिताच मला रूप येते छान, कृती जरी अवघड माझी, सर्व फराळात मीच आहे महान!!



**सौ. संध्या लक्ष्मीकांत बोन्द्रे**
**(सॅन अँटोनियो, टेक्सास मराठी शाळा)**

*(उत्तरे अंकाच्या शेवटी)*

# माझ्या दृष्टीतून अमेरिका



चित्रकार:
सौ. तेजश्री सौरभ मगदूम

मी, ज्युलिना कारखानीस, या आपल्या सॅन अँटोनियो महाराष्ट्र मंडळाच्या परिवारात नव्याने सामील झाले आहे. येथील मराठी शाळेच्या 'चिल्ली-पिल्ली' या वर्गातील मुलांना शिकविण्याचा आनंदही मला मिळत आहे आणि आता या 2022 च्या आपल्या दिवाळी अंकासाठी अमेरिकेसंबंधी माझे विचार मांडण्याची संधीही मला प्राप्त झाली याबद्दल मी सॅम परिवाराची खूप आभारी आहे.

“No one is born happy, but everyone is born with the ability to create happiness.” या उक्ती प्रमाणे सॅम परिवाराचे वातावरण हे मैत्रीपूर्ण व आनंददायी आहे हे मी नुकत्याच साजऱ्या झालेल्या गणेशोत्सवात अनुभवले. अतिशय शिस्तबद्ध रीतीने उत्साहात, आनंदात व तितक्याच शास्त्रशुद्ध पद्धतीने पूजाअर्चा करून सॅम परिवाराने बाप्पाचा उत्सव पार पाडला. आपल्या busy schedules मधून वेळ काढून सर्व सदस्यांनी सुंदर नृत्ये, बहारदार नाटये व गोड गाणी यांनी समारंभाची शोभा वाढवली.

गुढीपाडवा, मंगळागौरीचे खेळ, आषाढीची वारी व शिवाजीची राजांची आठवण करून देणारे काव्य - नाटय सादरीकरण हे तर छान होतेच, पण ढोल ताश्यांच्या गजरात समारंभाची सांगता जोशपूर्ण व अपूर्व होती. प्रत्येकाने आपापल्या सहभागाने व उपस्थितीने खूप मजा आणली. अशा या आनंद निर्मितीने आपण स्वतः ही आनंदी राहू शकतो आणि दुसऱ्यांनाही आनंद देऊ शकतो. हे इथे अमेरिकेत अनुभवास येते.

इथे अमेरिकेत आलेला प्रत्येकजण कसले ना कसले ध्येय डोळ्यासमोर ठेवून मेहनत करून सध्याच्या पदांवर काम करीत असतो. कष्ट हा अमेरिकेतील उंबरठयावरचा दिवा आहे. त्यामुळे वर्तमानात व भविष्यात दोन्हीकडे उजेड पडतो आणि ती संधी हा देश कष्ट करणाऱ्याला प्राप्त करून देतो.

'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हेही अमेरिकेतील गुणी लोकांनी आम्हाला दाखवून दिले. २०१६ साली बॉस्टन येथे आमच्या गाडीचा खूप मोठा अपघात झाला. माझे पती डॉक्टर उल्हास, मुलगी हनिका, जावई प्रदीप व मी, असे सर्वजण जीवावर बेतलेल्या प्रसंगातून परमेश्वरकृपे काही काळाने बाहेर आलो. पण तेव्हा धावून आलेली लुकेना, मोठे जावई निरंजन, छोटा आर्नन, तान्हा रोनन, अमेरिकेतील नातेवाईक, मित्र, परिचित यांची तर खूपच मदत झाली पण अपघात स्थळी असलेले सर्व अपरिचित अमेरिकन्स, 911 ला कॉल केल्याबरोबर हजर झालेले emergency services चे कर्मचारी, रस्त्यात आम्हाला मदत मिळेपर्यंत थांबलेली सगळी माणसं, हॉस्पिटल मधील डॉक्टर्स, नर्सेस यांनी निस्वार्थीपणे व तात्काळ लाख मोलाची मदत केली. त्यामुळेच आम्ही या प्रसंगाला तोंड देऊ शकलो. प्रत्येक प्राणीमात्रात असणाऱ्या भगवंतांचे दर्शन या सर्वांच्या रूपाने आम्हांला झाले.

या कठीण प्रसंगानंतर मला काही जणांनी विचारले, की, 'तुम्हाला आता कधीच अमेरिकेला यावंसं वाटणार नाही न!' मी उत्तर दिलं, 'अरे, आता तर या आमच्या अमेरिकेतील बंधु - भगिनींच्या उपकाराचे जे ऋण आहे ते फेडायला मी जरूर येईन.' कदाचित, या माझ्या बंधु - भगिनींसह मी सुपंथ धरावा अशी परमेश्वराची इच्छा असावी.

अमेरिका हा अत्यंत प्रगत देश आहे. सर्व प्रकारच्या सुविधा इथे आहेत. तंत्रज्ञान खूपच विकसित झाले आहे. हुशार आणि मेहनत करण्याची तयारी असणाऱ्या सर्वांसाठी ही भूमी योग्यच आहे. इथे केवळ भौतिक सुखसोयी किंवा सुविधाच नाहीत तर स्वकर्म करत राहून अध्यात्म मार्गावर वाटचाल करायलाही इथे वाव आहे. दुसऱ्याच्या प्रत्येक कामाचा, धारणांचा व विचारांचा येथील लोक खूप आदर करतात.

इथे कुठलेच काम श्रेष्ठ अथवा कनिष्ठ मानले जात नाही. इथे अनेक मंदिरे व धार्मिक संस्था आहेत. त्यांचे उपक्रम, त्या अनुषंगाने प्रस्तुत होणारे सण, समारंभ व इतर कार्यक्रम अतिशय एकजुटीने सर्व धर्म, पंथ आणि जातीची माणसं साजरे करतात. त्यामुळेच त्यांना stressful life असून सुद्धा जगायला उर्जा मिळते.

गम्मत म्हणजे, मला कित्येक वर्षांपासून आपली पवित्र गीता पठण करण्याची इच्छा होती. ५००० वर्षांपूर्वी भगवान श्रीकृष्णांच्या मुखातून विश्वाच्या कल्याणासाठी स्त्रवलेल्या या परमपूज्य गीतेचे वाचन, मनन, चिंतन व अध्ययन आपल्याकडून व्हावे असे सतत वाटायचे. त्याकरता online गीता क्लास मी अमेरिकेतून करू शकले आणि अजून करते आहे. त्यासाठी लागणारे उत्तम network व वेळ मला इथे मिळतोय. आपल्यासाठी लागणारा वेळ आपल्याला मिळणे हे अमेरिकेत शक्य झाले आहे. तसेच आपले आवडते काम करण्याचे स्वातंत्र्यही अमेरिकेने मला दिले. हेही या देशाचे वैशिष्टय आहे.

आपल्या भारतात भगवान श्रीकृष्णानी विशद केलेली गीता पठण करण्याची संधी, बुद्धी व सुविधा मला अमेरिकेतच मिळाली आणि जणू 'हे विश्वचि माझे घर' याचा प्रत्यय आणि अनुभव भगवंतांनी मला दिला.

प्रत्यक्ष कुरुक्षेत्रावर आपला भक्त व सखा अर्जुन याला श्रीकृष्ण यांनी कर्मयोगावर विशेष भर देत, जीवनाचे उदात्त आणि अद्भुत तत्वज्ञान असलेली गीता सांगितली. ही अपूर्व ज्ञानगंगा संजयाने दिव्यदृष्टीने धृतराष्ट्राला वर्णन केली. म्हणजे तेव्हाही, हजारो वर्षांपूर्वी भारतात दिव्यदृष्टीरुपी, सूक्ष्मातिसूक्ष्म मोबाईल होते, जे बनविण्याचा प्रयास सध्या सगळं 'विज्ञानप्रगत' जग करत आहे. ही विज्ञानाच्या प्रगतीची आस तर वाढत जाईल आणि प्रयत्नांती नक्कीच ते साध्य होईल. पण त्यातून चिरकाल टिकणारी मनः शांती व परामानंदाची प्राप्ती होईल का? त्यासाठी तरी इथल्या सुविधांद्वारे आपल्या परमपूज्य गीतेचे पठण आपण करूया. त्यातून विज्ञानातील अनाकलनीय गोष्टींचे गूढ उकलेल. परमानंद प्राप्तीच्या दिशेने, सुपंथाने जाण्याचे ते पहिले पाऊल असेल.

भगवान श्रीकृष्णाचे सुखद, आश्वस्त, दयाशील आणि मैत्रीपूर्ण अस्तित्व खरोखरचं आनंददायी आहे. फक्त आपण जिथे असू तिथून त्यांना मनापासून साद घालण्याचा अवकाश आहे.

***कौन कहते हैं, भगवान आते नहीं, भक्त मीरा के जैसे बुलाते नहीं।***
***कृष्ण दर्शन तो देंगे कभी ना कभी, प्यारसे तुम कभी तो बुलाया करो॥***
***अच्युतम् केशवम् कृष्ण दामोदरम् राम नारायणम् जानकी वल्लभम्॥***

**लेखिका: सौ. ज्युलिना कारखानीस**

# का?

का सुटावे धैर्य माझे, प्रश्न मजला का पडावा ?।।
माझिया चित्तास का या दुर्गुणांचा भार व्हावा?।।१।।

तप्त व्हावे, गळुन जावे, विरघळावे, हे खरे मग।
मूस कुठलीही असो, का फरक सोन्याला पडावा?।।२।।

वाढणे अन डवरणे हा मूळ हेतू मान्य तर मग।
कोण खाली बैसतो का प्रश्न वृक्षाला पडावा?।।३।।

निर्झराने कोसळावे प्राक्तनाचा खेळ त्याच्या।
मग तुषारांच्या क्रिडेला का उगा आक्षेप घ्यावा?।।४।।

उजळती वस्तू जिथे ते श्रेय किरणांचे म्हणावे।
सावली पडते तिथे हा दोष कोणाचा धरावा ?।।५।।

केंद्र माझे, व्यास माझा, परिघ माझा आखलेला।।
का उगा कक्षेस माझ्या ताणण्याचा दंभ व्हावा?।।६।।

दगड आहे मान्य केले की उरे आशा कशाची।
मूर्तिकाराची वळो दृष्टी असा का मोह व्हावा?।।७।।

जाऊदे आहे जसे तैसे करावे मान्य सारे।
मीच कर्तृत्वास माझ्या का फुका सन्मान द्यावा?।।८।।

**कवी: श्री. राजेंद्र वैशंपायन**

# ठसे

समुद्रकिनाऱ्यावरून चालत होतो.
वाळूवर पावलांचे ठसे उमटत होते.
मी समुद्राला म्हटलं
“दररोज भरतीत माझ्या पावलांचे ठसे
वाळूवरून मिटवण्यासाठी का इतके कष्ट घेतोस?“
सागर म्हणाला,
"दररोजचा दिवस नाविन्याने जगा
हे लोकांना शिकवण्यासाठी अख्खा सूर्य गिळतो मी,
तुझे पावलांचे ठसे ही काय फार मोठी गोष्ट आहे मला?"

**लेखक: श्री. राजेंद्र वैशंपायन**

*'राजेंद्र वैशंपायन' हा माझा (श्री. लक्ष्मीकांत चंद्रकांत बोन्द्रे) शाळेतील वर्गमित्र आहे.*
*त्याला हरहुन्नरी कलाकार म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.*
*तो लेखन, कविता, गायन, संगीत इ. अशा विविध कलाक्षेत्रात कार्यरत आहे.*
*वरील लिखाण हा त्याने निर्मिलेला एक साहित्यप्रकार आहे.*
*त्याने त्याला अलक (अति लघु कथा) असे नाव दिले आहे.*
*कमीत कमी शब्दांत एखाद्या कथेचे सार, गाभा, किंवा मतितार्थ हे अतिशय प्रभावशाली पद्धतीने मांडणे म्हणजे अलक.*
*- श्री. लक्ष्मीकांत चंद्रकांत बोन्द्रे*

# दिवाळीचे आकाशकंदील








कलाकृती: सौ. चारुता देशपांडे भागवत

# महाराष्ट्रातील मंदिरे आणि धार्मिक स्थळे

**अष्टविनायक**: महाराष्ट्रात गणेशाची खास अशी आठ मंदिरे आहेत. त्यांना "अष्टविनायक" असे म्हटले जाते. ही सर्व मंदिरे महाराष्ट्रात विविध ठिकाणी आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे ही सर्व स्वयंभू आणि जागृत देवस्थाने आहेत. प्रत्येक गणपतीची एक वेगळी गोष्ट आहे आणि प्रत्येकाची नावेही वेगळी आहेत:

| | |
|---|---|
| मोरगांवचा मोरेश्वर, | थेऊरचा चिंतामणी, |
| सिद्धटेकचा सिद्धिविनायक, | रांजणगावचा महागणपती |
| ओझरचा विघ्नेश्वर, | लेण्याद्रीचा गिरिजात्मज, |
| महडचा वरदविनायक, | पालीचा बल्लाळेश्वर. |






**पंढरपूर**: भारताची दक्षिण काशी आणि महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून हे पवित्र ठिकाण ओळखले जाते. चंद्रभागेच्या तीरावर वसलेले हे तीर्थक्षेत्र विठ्ठल आणि रुक्मिणीचे देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी वारकरी आषाढी आणि कार्तिकीला इथे आवर्जून येतात. हे पंढरपूर गाव सोलापूर पासून ७२ किलोमीटरवर आहे.

**शिर्डी**: हिंदू, मुस्लिम आणि इतर सर्व लोक ज्यांना गुरु, संत मानतात त्यांचे निवासस्थान. "श्रद्धा आणि सबुरी" यांची शिकवण देणारे "श्री साई बाबा" यांचे निवासस्थान म्हणजे शिर्डी. साई बाबा हे सर्व भारताचे संत किंवा गुरु म्हणून ओळखले जातात. शिर्डी अहमदनगर जिल्ह्यात असून, ते अहमदनगर शहरापासून ८२ कि.मी. दूर आहे.






**कोल्हापूरची अंबाबाई**: हिंदूंच्या साडे तीन शक्ती पिठांपैकीं एक म्हणून ओळखले जाणारे हे देवस्थान. पुराणानुसार शक्तीपीठ म्हणजे शक्तिस्थळ, शक्तीची देवता! कोल्हापूर या गावी लक्ष्मीचे मंदिर आहे. जिची स्तुती "आदिमाया अंबाबाई साऱ्या दुनियेची आई" अशी केली जाते.

**भीमाशङ्कर (भीमाशंकर)**: पुण्यापासून अगदी जवळच असलेले आणि सह्याद्री पर्वताच्या घाटात वसलेले, खेड तालुक्यातील गाव म्हणजे भीमाशंकर. भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एका ज्योतिर्लिंगाचे मंदिर भीमाशंकर येथे आहे.





**नरसोबाची वाडी**: नृसिंहवाडीला लोक नरसोबावाडी किंवा नरसोबाची वाडी या नावाने ओळखतात. कोल्हापूर शहराजवळ असलेले हे एक छोटे गाव आहे. श्री नृसिंह सरस्वती स्वामी या भागात १२ वर्षे औदुंबराच्या जंगलात राहिले. ही जागा निसर्गतःच अतिशय सुंदर आहे ते म्हणजे कृष्णा नदी आणि पंचगंगा सागर यामुळे आणि औदुंबराच्या घनदाट जंगलामुळे! "स्वामी श्री नृसिंह सरस्वती" यांना "श्री दत्तात्रय" यांचा पूर्ण अवतार मानले जाते. या ठिकाणी स्वामींच्या पादुका सर्वांना दर्शन घेण्यासाठी ठेवलेल्या आहेत.

**शनी शिङ्गणापूर (शनी शिंगणापूर)**: शनी शिंगणापूर एक छोटे गाव आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये शनी देवाचे मंदिर आहे. या मंदिरामुळेच हे गाव प्रसिद्ध आहे. हे मंदिर शिर्डी पासून खूप जवळ आहे. या देवस्थानची ख्याती दूरदूर वर घरांना दरवाजे नसलेल्या आगळ्या वेगळ्या देवस्थानच्या रुपात जगात प्रसिद्ध आहे. हे देवस्थान श्री शनी दर्शनासाठी २४ तास उघडे असते. श्री शनिदेवाचे हे एकमात्र देवस्थान आहे. श्री शनी देव आपला शत्रू नसून, मित्र आहे. आपल्या दैनंदिन जीवनात तेजपुंज व शक्तीशाली शनीचे आगळे-वेगळे महत्व आहे.






**त्र्यंबकेश्वर**: हे मंदिर "ब्रम्हगिरी" पर्वताच्या पायथ्याशी आहे, जिथे पवित्र दक्षिण गंगा (गोदावरी) नदी उगम पावते. नाशिक शहरापासून २८ किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. ते १७५५-१७८६ मध्ये श्री. नानासाहेब पेशवे यांनी बांधले. "त्र्यंबक" हा शब्द त्रिमूर्ती (त्रिदेव) दर्शवतो: भगवान ब्रह्मा, भगवान विष्णू आणि भगवान महेश. येथे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग आहे. संत ज्ञानेश्वरांनी वयाच्या चोविसाव्या वर्षी त्र्यंबकेश्वर येथे समाधी घेतली.

**परळी वैजनाथ:** श्री वैजनाथ मंदिर हे एक प्राचीन शिव मंदिर आहे. बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ या गावी हे मंदिर आहे. हे मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे असे मानले जाते. हे मंदिर तीनशे वर्षे जुने आहे असे मानले जाते. हे एका टेकडीवर दगडांनी बांधलेले आहे. कृष्ण आणि शंकर या दोन्ही देवांचे उत्सव येथे साजरे केले जातात.






**पैठण:** पैठण हे शहर महाराष्ट्राच्या औरंगाबाद जिल्ह्यात आहे. पैठण हे नांव खूप साऱ्या धार्मिक संतांशी जोडले गेले आहे. उदाहरणादाखल म्हणजे संत ज्ञानेश्वर ,संत सोपानदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, चांगदेव महाराज, संत एकनाथ. पैठण म्हणजे संत एकनाथांचे घर आणि समाधी स्थळ. पैठणपासून जवळच असलेल्या गावात संत ज्ञानेश्वर आणि त्यांची तीन भावंडे राहत होती. हे शहर प्राचीन दिगंबर जैन क्षेत्र म्हणून सुध्दा प्रसिद्ध आहे.

**शेगाव:** संत गजानन महाराज यांचे नाव घेतले की आठवते ते म्हणजे शेगाव. हे गाव बुलढाणा या महाराष्ट्रातील जिल्ह्यात आहे. संत गजानन महाराज यांचे मंदिर शेगाव येथे आहे. शेगाव येथे ते प्रथम प्रगट झाले. त्यांच्या समाधीच्या जागेवर मंदिर बांधले आहे. विदर्भ भागातील हे सर्वात मोठे देवस्थान आहे आणि म्हणूनच याला "विदर्भाचे पंढरपूर" म्हटले जाते.






**पर्वती:** पुण्यातील पर्वती टेकडीवर प्राचीन मंदिर आहे, जे पेशव्यांच्या काळात बांधले गेले होते. या पर्वती टेकडीवर खूप पर्यटक येतात, ते उंचावरून संपूर्ण पुण्याचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी! टेकडीवर जिथे मंदिर आहे तिथे पोहचण्यासाठी १०८ पायऱ्या चढून जावे लागते. पर्वती टेकडीवर ५ वेगवेगळी देवळे आहेत: शिव-पार्वती, कार्तिकेय, विष्णू, विठ्ठल, आणि राम. मंदिरांसोबतच पर्वती टेकडीवर पेशव्यांचे संग्रहालय आहे. तसेच पर्वती टेकडीवरील पाण्याच्या टाकीतून अर्ध्या पुणे शहराला पाणी पुरवठा होतो.

**ज्योतिबाचा डोंगर**: श्री ज्योतिबा हा, ब्रह्मा, विष्णू, आणि महेश यांनी रत्नासुराचा वध करण्यासाठी घेतलेला अवतार मानला जातो. 'जोतिबाचा डोंगर' हे तीर्थक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यात आहे. ज्योतिबा डोंगरावर तीन प्रमुख देवळे आहेत. ती ज्योतिबाचा अवतार असलेल्या केदारलिंग, केदारेश्वर व रामलिंगाची आहेत. ज्योतिबा हे दैवत शिव व सूर्याचे रूप मानण्यात येते. ज्योतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावणशुद्ध षष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी होते.





**अक्कलकोट**: श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणुन अक्कलकोट प्रसिध्द आहे. अक्कलकोट शहर सोलापूर जिल्हा मुख्यालयापासून ३८ कि. मी. अंतरावर वसलेले आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांना श्री दत्तात्रयाचे अवतार मानले जाते. दर वर्षी चैत्र शुद्ध त्रयोदशीला स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी केली जाते. श्री दत्तात्रयाचे चौथे अवतार मानले गेलेल्या श्री स्वामी समर्थांचा एकूण कार्यकाळ ४० वर्षांचा आहे त्यापैकी २१ वर्षे त्यांचे वास्तव्य अक्कलकोट येथे होते. राज्यातून व पर राज्यातून मोठ्या संख्येने भक्तगण नित्य नेमाने भेट देतात

**पंचवटी**: पंचवटी हे नाशिक शहराच्या उत्तर-पश्चिमेस गोदावरी नदीच्या काठावर वसलेले एक अतिशय पवित्र तीर्थक्षेत्र आहे. ज्याचा हिंदू महाकाव्य रामायणाशी जवळचा संबंध आहे. पंचवटीत पाच वटवृक्षांचा समूह आहे, जेथे भगवान रामाने, माता सीता आणि लक्ष्मण यांच्यासोबत वनवासाचा काही काळ घालवला होता. नाशिकचे भारतातील धार्मिक शहरांमध्ये सर्वात वरचे स्थान आहे आणि येथे गोदावरी नदीच्या काठावर कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. पंचवटी हे पर्यटन स्थळ आपल्या धार्मिक संस्कृतीसाठी खूप लोकप्रिय आहे.






**गणपतीपुळे**: गणपतीपुळे हे गणपतीचे देवस्थान प्राचीन आहे. हे प्राचीन देवस्थान रत्नागिरी जिल्ह्यात आहे आणि पेशवेकालीन आहे. गणपतीपुळे हे मुंबई पासून सुमारे ३५० किलोमीटर अंतरावर आहे. हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ झाले आहे, कारण इथे खूप मोठा समुद्र किनारा आपल्याला पाहायला मिळतो. येथील मूर्ती गणपतीची ही स्वयंभू आहे असे म्हटले जाते. पश्चिमेला अरबी समुद्र असल्यामुळे हे मंदिर खूप जास्त सुंदर दिसते.

**वरील सर्व माहिती व चित्रे इंटरनेट वरून घेऊन एकत्र करून सादर केली आहेत.**

**सादरकर्ता: लंबोदर उर्फ श्री लक्ष्मीकांत बोन्द्रे**

# शब्दकोडे - महाराष्ट्रातील मंदिरे व धार्मिक स्थळे




**उभे शब्द**

२. श्रीराम, सीतामाई आणि लक्ष्मण वनवासात असताना नाशिक मधील ह्या ठिकाणी राहिले होते.

३. नाशिक मधील गोदावरी किनारी असलेले ज्योतिर्लिंग.

४. पुण्यातील खेड तालुक्यामधील प्रसिद्ध ज्योतिर्लिंग.

६. श्री साईबाबांचे देवस्थान असलेले शहर.

७. सोलापूर जिल्ह्यातील श्री स्वामी समर्थांचे देवस्थान असलेले शहर.

१०. बीड जिल्ह्यातील ३०० वर्षे जुने असलेले शंकराचे प्रसिद्ध मंदिर.

११. कोकण समुद्रकिनारी असलेले रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीचे प्रसिद्ध मंदिर.

१३. रत्नासुराचा वध करण्यासाठी ब्रह्मा, विष्णू, महेश ह्या तिघांचा अवतार असलेल्या देवाचे कोल्हापूर मधील टेकडीवरील देवस्थान.

**आडवे शब्द**

१. श्री गजानन महाराज यांचा मठ असलेले गाव.

२. विठोबा रखुमाई यांचे प्रसिद्ध देवस्थान.

५. अहमदनगर जिल्ह्यातील शनी देवाचे देवस्थान.

७. महाराष्ट्रातील आठ गणपतींची यात्रा.

८. कोल्हापूरची महालक्ष्मी.

९. संत एकनाथांचे गाव.

१०. पेशव्यांचे पुण्यातील टेकडीवरील जागृत देवस्थान.

१२. कोल्हापूरमधील कृष्णा नदीच्या काठावरील नृसिंह सरस्वती यांचे मंदिर.

**कोड्याचे रचनाकार - लंबोदर उर्फ श्री लक्ष्मीकांत बोन्द्रे**

*(उत्तरे अंकाच्या शेवटी)*

# पाककृती - कोलंबी पुलाव

## कोलंबीचा पुलाव

### साहित्य

अडीच पेले बासमती तांदूळ,
कोलंब्या एक मोठी वाटी,
४-५ कांदे,
खडा मसाला,
मालवणी मसाला,
गरम मसाला छोटा चमचा,
१ चमचा हळद,
थोडी कोथिंबीर बारीक चिरून,
थोडे तेल,
तूप
चिमूटभर हिंग
चवीनुसार मीठ

### वाटण

८-९ हिरव्या मिरच्या, दीड गड्डा लसूण, थोडी कोथिंबीर व १ मोठा कांदा



### कृती

1. बासमती तांदूळ २-३ वेळा पाण्यात बुडवून हलक्या हाताने पाणी साफ काढून चांगले १-दीड तास सुकवून घ्यावे.
2. कोलंबी त्यातील काळा धागा काढून स्वच्छ धुऊन घ्यावी.
3. नंतर त्यात वर उल्लेख केलेले वाटण, हळद, मालवणी मसाला व मीठ घालून थोडा वेळ झाकून ठेवावे.
4. एका जाड पातेल्यात एक चमचा तूप टाकून खडा मसाला परतून त्यात सुकवलेले बासमती तांदूळ बारीक गॅसवर हलकेच भाजावे.
5. दुसऱ्या मोठ्या पातेल्यात तेल गरम करून चिरलेला कांदा वाफेवर शिजू द्यावा.
6. नंतर त्यात कोलंबी आणि वाटण घालून परतून घ्यावे.
7. सपाट पाच पेले पाणी घालून चांगली ऊकळी घ्यावी.
8. भाजलेला तांदूळ त्यात टाकावा.
9. पाच मिनिटांनी गॅस बारीक करून झाकण ठेवून चांगली वाफ आली की त्यात चिरलेली कोथिंबीर घालावी.

© 2010 Vertex42.com

पाककृती- सौ. निरुपा प्रवीण गोरेगावकर

# पाककृती - हलीमाचे लाडू

## हलीमाचे लाडू

**साहित्य**

१०० ग्राम हलीम
एक नारळ
साजूक तूप ५ -६ चमचे
गूळ
वेलचीपूड
थोडी जायफळ पावडर

**कृती**

1. नारळ फोडून नारळाच्या पाण्यात हलीम ३-४ तास भिजवावा.
2. पातेल्यात ४-५ चमचे साजूक तूप घालून हलीम थोडा ८-१०मिनिटे परतून घ्यावा.
3. खोबरे असेल त्या प्रमाणात गूळ बारीक करून घ्यावा.
4. खोबरे व गूळ एकत्र करून हलीमामध्ये चांगला परतून घ्यावा.

© 2010 Vertex42.com

5. गूळ वितळून मिश्रण चांगले एकजीव झाल्यावर त्यात वेलची व जायफळ घालून १-२ चमचे साजूक तूप घालावे.
6. हाताला तूप लावून लाडू वळून घ्यावे.


हलीम गरम असल्यामुळे थंडीच्या दिवसांत करावे. मुलांनाही आवडतात.



© 2010 Vertex42.com

**पाककृती- सौ. निरुपा प्रवीण गोरेगावकर**

'निरुपा प्रवीण गोरेगावकर' (माझ्या सासूबाई), मुंबई विद्यापीठामध्ये ४० वर्षे नोकरी करून उपकुलसचिव (Deputy Registrar) पदावरून डिसेंबर २०१४ मध्ये रिटायर झाल्या. त्यांना पाकशास्त्राची खूप आवड असल्यामुळे तो छंद त्या आजपर्यंत जोपासतात. तसेच त्यांना हिंदी जुनी गाणी ऐकायला व गायलाही खूप आवडतात. ह्या रेसिपी नक्की करून पहा आणि त्या तुमच्या मित्र आणि कुटुंबियांसोबत शेअर करा.
- सौ. रेश्मा निखिल गोरेगावकर



# U.S. Vice President AL Gore recognizes Go Green efforts at BMM Convention

Climate change is the defining crisis of our time. All around the world, people are feeling the effects of climate change, despite the best efforts of many to slow it down. The climate challenge is gargantuan, due largely to fossil fuel executives and corporations. We need to eliminate greenhouse gas emissions from a multitude of industries, including but not limited to, electricity, buildings, transportation, and agriculture. Eliminating these emissions are just the first of many steps needed to protect and restore our ecosystems. We need to change society, policy, economy, and culture. As the climate change clock ticks faster and faster, the best way to cope is to avoid dwelling on terrifying scientific projections. We need to act, vote, protest, donate, and spread the word.

The North American Marathi community decided to do their part and took a first step of hosting the *Go Green* BMM convention in NJ. This happened for the first time in the history of BMM conventions. As a team leader of the Go Green initiative at BMM 2022 convention, my team and I faced many challenges in executing a 100% green and sustainable convention. It quickly became clear that we instead needed to make a gradual pivot to implementing as many solutions as possible towards reducing our carbon footprint.

Here are some accomplishments of the *Go Green* initiative taken throughout the convention.

1. **Decorations**: The team did an exemplary job by not using plastic or Styrofoam material for venue decoration. They replaced plastic with recyclable foam boards which were later sold_and re-purposed at other events.
2. **Food**: Leftover food after each meal was distributed to charitable organizations. This stopped harmful Methane gas production by food spoilage at the landfills.
3. **Food**: *OneCompostingCan*, a vendor provided Farm-to-Table and residential pick-up composting services to his NJ customers including Tree planting.
4. **Food Service**: Biodegradable cutleries were expensive. Maharashtra Foundation (MF) generously raised funds to prevent use of plastic cutlery. Whenever possible, these funds were used to purchase biodegradable cutleries and biodegradable trash bags for recycling. Infographic posters showing effects of Food and Water waste were prepared for educating attendees.
5. **Food Service**: Silk tablecloths were used instead of plastic in the dining hall.
6. **Environmental regeneration**: Plant seeds were distributed to support biodiversity.
7. **Education**: Rahul Shendure, CEO of CarbonBuilt and Ocillia Power, presented carbon dioxide capturing technology from cement in construction industry and utility-scale power from ocean waves.

With the *Go Green* Team and BMM Convention Committee accomplishing the tremendous task of attempting to host a sustainable convention, even **our former U.S. Vice President Al Gore** was overwhelmed. He sent a congratulatory video message to the BMM team. We should all be very proud that this feat occurred for the first ever time at any BMM Convention and global Marathi Mandal event. We hope to inspire future events and conventions to implement green initiatives.

**Here is the link to Mr. Al Gore's video message for Marathi community:**
**https://drive.google.com/file/d/1cEFNyecDGke-1TeY62g6bO5MRhozG1d/view**
***(Copy of web browser for watching the video.)***

In addition to the Go-Green team's efforts, our next generations of Marathi youth have now know that they too play an important part in preserving our only home - Planet Earth because they realized that ***There Is No Planet B.*** Watch their conviction and messages to our community in the above link as well.

We want to thank Prashant Kolhatkar for whole-heartedly supporting the *Go Green* initiative. I called him in January 2021 to express my interest in hosting a *Go Green BMM Convention*. We discussed what it would mean to saving our environment, to the Marathi community, and finally to the BMM organization. Implementing the *Go Green* initiatives would educate the mass crowd and create an impact with our meaningful actions at BMM.

I am also thankful to BMM team members: Amol Purav, Mukul Dakwale, Vihar Despande, Pooja Shirodkar, Gauri Choudhy, Ananad Chouthai, Snehal Vaze, Dnyanda Bhide, Sandeep Dharam, Rahul Pawar, Mohan Ranade, Samranika, and the Uttarang team. To my *Go Green* team, without their support this work would not have been possible. To Rajiv Bhalerao, the President of Maharashtra Foundation, for believing in us to approve big funds for *Go Green* initiative. Finally, Sunil Deshmukh, Shirish Gupte, Rajan Gadkari, Shobha Chitre, and Dev & Rupa Wadke, Alka &Prakash Lothe whose support and wishes helped us. (If I forgot someone who supported us, my apologies in advance).

In conclusion, I am sending you an open invitation to find your role, if you haven't already. Encourage others to find theirs. BMM 2024 should continue what we have started and achieve more ambitious results to mitigate climate change. This is the work of many lifetimes to avert a Climate Catastrophe.

**Mrs. Darshana Gupte**
**BMM2022 Go Green Team Leader**

# दिवाळी



आनंदाची उधळण करत जसा
सण येतो दिवाळीचा,
तुमच्या आमच्यातील तसा
बंध फुलो प्रेमाचा!

दिव्या पणत्यांनी जशी
नटावी ही धरणी,
तुमच्या आमच्यातील तशी
वाढत जावो पुण्याई!

फराळ मिठाईने जशी
रंगत यावी न्यारी,
तुमच्या आमच्यातील तशी
बहरू दे दिल दोस्ती दुनियादारी!

कंदील लावू रांगोळी
काढू उत्साहाने,
नव वर्ष साजरे करू
आपण सारे जोमाने!

**दिवाळी व नववर्ष शुभेछा २०२२!!**




चित्रकार: कु. शौनक भागवत
मराठी शाळा विद्यार्थी
इयत्ता: जुनिअर पहिली

कवयित्री: सौ. संयोगिता अभिजित आपटे

# <u>तूच तो</u>

तूच नभातून, ढगांतूनही तूच
तूच या आसमंती, चराचरांतूनही तूच
पवनरूपे वाहसी दाहीदिशांतून तूच
दरवळसी सुमनांच्या गंधकोषांतून तूच
गावागावात, शहराशहरातही तूच
गल्लोगल्ली, आणि घराघरातही तूच
धुंद हवेच्या कणाकणातही तूच
जनाजनांच्या बेधुंद मनातही तूच
रंगहीन, निराकार जरी तूच
कर्णमधुर स्वरसंचार तरी तूच
प्रत्यक्षात आज हरवलास जरी तूच
अंतरात आमुच्या उरलास तरी तूच
आठवांनी तुझ्या भरून येई आज उर
देव नाही, दैव नाही ....................
*तूच तो, तूच तो, लताचा सूर*
*तूच तो, तूच तो, लताचा सूर*

**कवी - लंबोदर उर्फ श्री लक्ष्मीकांत बोन्द्रे**

# स्मृतिपुष्प



स्वरसम्राज्ञी, गानकोकिळा, भारतरत्न

**लता मंगेशकर**

(२८ सप्टेंबर १९२९ - ६ फेब्रुवारी २०२२)

(हे चित्र इंटरनेट वरून घेतले आहे.)

# The Musical Journey of Bodas Family

**When, where and how did you get connect to the world of Music?**

**Rachna:** Well, I was born in a family where music was always around. My grandfather use to play sitar and my father is an accomplished Tabla player in Kanpur. Though he did not pursue it as a career, but it was definitely more than a hobby. So, I can say that I got connected with this music world in my very early childhood. My father was the one who saw that sense of music in me. He used to teach me lots of popular bhajans and make me participate in various competitions. Later my formal Hindustani Classical Music training started under my Guru Pt. Kashinath Bodas ji in Kanpur. After his untimely demise, my music training continued with Late. Vidushi Veena Sahasrabuddheji.

**Sandeep:** I am born in a musical family. My grandfather Pt. Shankar Shripad Bodas was a disciple of “Maharaj” Pt Vishnu Digambar Paluskar. My grandfather lived his entire life teaching, performing, and spreading the Indian music in North India as directed by his guru and then my father Pt Kashinath Bodas continued the tradition. So, my connection to Indian Classical music was by birth. I am so fortunate and blessed to be born in such a family. Music is integral part of me I will be forever indebted to my parents and gurus for this priceless gift.

**After moving to USA what was your experience about Indian Classical Music in USA?**

**Rachna:** It was a very different experience initially after moving to USA. It took some time for me to settle myself musically since the (mahaul) environment of Indian classical music was missing. As we all will agree with the music scene in India where music concerts, gathering, workshops and lots of music exposure to our everyday lives is something we miss in this country specially here in San Antonio.
That is when and how the Swaranjali School of Hindustani Classical music was formed to initiate, create, and spread music.

**Sandeep:** Indian classical music is nicely spread out in big cities of USA especially in east coast and west coast, thanks to our legends like Pt Ravi Shankar, Ustad Ali Akbar Khan etc. for bringing Indian music to USA. However Indian music is not that active in other parts of USA like Central and Northwest regions. But I must say that overall, the interest for Indian classical music continues to grow among all ages in USA and that is a positive sign.

**For Rashi and Riya, being from Indian Classical Musical Family background, you must be learning Indian classical music. But as you are going to schools in USA, what is your thought on other style of music like western style etc. and are you learning that?**

**Riya:** Yes, Rashi and I learn Western Music (Choir) at school, and we enjoy it just as much as Hindustani Music. Both styles have comparable similarities yet different from each other.

Learning and Practicing Hindustani Classical Music has benefited us in building our voice culture, control over notes which helps us with the Western Style of music as well. Learning both the styles have widened our view towards music and help us appreciate and understand it in a better way.
We are grateful that we both have musical environment around us since childhood. We enjoy both Hindustani Classical Music as well as Western Music and both styles are close to our hearts.

**What recommendations could you share for people who want to learn music?**

**Rachna:** I can, definitely, say that it is never late. Anyone can learn music at any age. Whether one wants to learn any form or genre of music. if one has passion and dedication then surely it can be pursued and taken forward. We live in digital world, where sitting at home you can find good institutions, Music Schools and teachers who can help one to pursue and learn what they want.
We have Swaranjali School of Hindustani Classical Music School in San Antonio and, also lots of Schools for Carnatic Music as well.

**Sandeep:** As we all know, learning any form of art brings positive changes to your personality and creativity, in addition to this, music, in particular, also brings spiritual angle to your life and nourish your soul. I highly recommend everyone to learn at least one form of music - Instrumental or vocal and I can assure, it will become a great companion as you grow. The "Naad" or sound of Music as we call in English, will help you de-stress and rejuvenate.

**Music is significant part of any culture. Being in a foreign country what are your thoughts on spreading Indian Classical Music in this country?**

**Rachna:** Absolutely, Music is the easiest medium to connect in any culture. It is form of an expression and also intrinsic part of gatherings, festivals, and belief systems. Being in foreign country we are more exposed to Western Music culture. I am trying to spread Indian Classical Music as this is an ancient art form which came from the time of Gandharvas and it is the easiest medium to connect with the divine, our roots, portray our rich Indian culture and musical tradition. It can transform students' passion into a lifelong journey of reward and fulfillment. I feel so fortunate and blessed to be able to be the medium of spreading and introducing people to this art form of Indian Classical music.

**Sandeep:** This may be a long shot but, in my opinion, one of the best ways to promote and spread Indian Classical music is to introduce it in schools and colleges as elective course. Other option to spread is to have regular music festivals across the country that includes the workshops and concerts so that it helps both the music students and avid listeners.



# तो एक क्षण

हाऊडी! अहो म्हणजे, नमस्कार! कसे आहात? बरे आहात ना? आता गेल्या एका दशकापासून मी, टेक्सास मध्ये राहतोय म्हंटल्यावर इथल्या काही सवयी तर लागणारच ना. तसं सवयीचे म्हणाल तर, नको त्या सवयी अगदी पटकन लागतात हो! पण चांगल्या सवयी अंगीकृत करणे म्हणजे अव्हाकाडो मधली बी किंवा फणसातून गर, नुसत्या हाताने काढण्यापेक्षाही कठीण.

आता माझेच बघा ना, मी लहान असतांना, माझी आई मला नेहमी सांगायची की, “लवकर निजे, लवकर उठे, त्यासी आरोग्य धनसंपदा लाभे” आणि म्हणूनच तिचा रोज प्रयत्न असायचा की मी सकाळी लवकर उठावे, पटापट तयारी करून चांगला अभ्यास करावा. पण मी, रात्रभर डोळे फाडुन चित्रपट पाहणारा व सकाळी उशिरा पर्यंत साखर-झोपेत कुंभकर्णा सारखा लोळत पडलेला, लवकर उठेल तर शप्पथ! त्यामुळेच माझे आई-पप्पा, मला उठवण्यासाठी रोज काहीना काही नवनविन युक्त्या करायचे. कधी घड्याळाचा अलार्म कानापाशी आणून वाजवणार तर कधी ताट, वाटी व चमचा घेऊन, एखाद्या जुन्या गाण्याच्या तालावर बडवणार आणि नाहीच काही तर तांब्याभर थंड पाणी घेऊन डोक्यावर बदाबदा ओतणार. तेव्हा झोपेतच अंघोळ झालेला मी कसाबसा उठायचो व तयारी करून, डुलक्या देत झाला अभ्यासाला बसायचो. आता तुम्ही म्हणाल की हे जरा अतिच झाले ना पण त्यांचंही काही चुक नव्हते ना हो, हे मला हळुहळु कळत होते. अहो समाजात स्पर्धाचं इतकी वाढलेली की विद्यार्थीचे एका एका गुणाने महाविद्यालयातले ॲडमिशन हुकायचे. माझ्याही आई बाबांना वाटायचे की मीही खुप अभ्यास करावा आणि डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावे व ते म्हणतात ना, “बेटा हमारा ऐसा काम करेगा, खानदान का नाम रोशन करेगा” असेच काहीतरी वाटत असावे. तसं पाहतां हे काही फक्त माझ्या सोबतचं व्हायचं असं काही नाही, घरोघरी मातीच्या चुली सारखं माझे सर्व मित्र पण ह्यातुनच जात होते.

मलाही समाजातील स्पर्धा-जगाची हळूहळू कल्पना यायला लागली होती व मीही त्याचा नकळतच भाग झालेलो. आधी दहावीची बोर्डाची परीक्षा, म्हंटलं झालं! पण नाही, मग बारावी बोर्डाच्या परीक्षा, म्हंटलं. आता झालं! पण तरीही नाही, नंतर सीईटीची परीक्षा, असं करत करत ही मला इंजिनीअरिंगच्या महाविद्यालयात ॲडमिशन मिळाले. म्हंटलं आता तरी झालं! पण नाहीच, तिथेही स्पर्धा. चांगली नोकरी पाहीजे असेल तर चांगले गुण पाहीजे म्हणून तिथेही टॉप करत, सर्व वर्ष डीस्टीकंशने पास झालो. तेव्हा वाटले झालं सगळं आता! “बन गया मैं इंजिनिअर, अपनी तो लाइफ बन गयी” असं वाटलेले पण ही तर नुसती सुरूवात होती, खरी स्पर्धा तर त्या नंतर सुरू होते. बरेच लोक त्याला “रॅट-रेस” असे देखील म्हणतात व ती सुरू होते, पहिली नोकरी मिळाल्या नंतर मी पण त्या रेस मध्ये सहभागी झालो. ही नोकरी पकड, अन् एक वर्ष होतं न होतं, अजुन चांगली पगाराची मिळाली की ती नोकरी पकड, असे करत अजून सतत धावपळ सुरू असायची. तुम्ही कितीही नाही म्हणा पण, समाजात प्रत्येक स्तरावर चढाओढ ही तर सुरूच असते. त्याच चढाओढ करण्यामध्ये मला कळाले की माझ्या काही मित्रानां, कुणाला दुबई तर कोणाला लंडन मधे नोकरी लागलीये. मग काय माझीही शोध मोहीम सुरू झाली आणि त्यातच एका अमेरिकन कंपनीत नोकरीची संधी मला मिळाली.

अमेरीकेत आल्यावरही माझी ती रॅट-रेस काही थांबली नाही, ती तशीच सुरु होती. धावाधाव, पळपळ करत चांगल्या हुद्द्याची, चांगल्या पगाराची आणि इथे त्याहून महत्वाचे म्हणजे अमेरीकेचा विजा करून देणारी नोकरी शोधत राहणे. हा प्रोजेक्ट झाला की तो, तो झाला की अजून एखादा नवा प्रोजेक्ट असं सुरुच होतं. तसंच करता करता मला एक संधी मिळाली अन् मी, सॅन ॲटोनियो, टेक्सास मध्ये नोकरीसाठी आलो.

टेक्सास हे अमेरिकेच्या दक्षिणेकडचे राज्य. बऱ्यापैकी भारतासारखंच वातावरण असल्याने तिथे “ॲडजस्ट व्हायला, मला जास्त वेळ नाही लागला. टेक्सास म्हंटलं की ईंग्रजीत एक दोन म्हणी प्रचलित आहेत. “एव्हरी थिंग ईझ बिग ईन टेक्सास” व “गो बिग और गो होम” याचा अर्थ असा की टेक्सास मध्ये सर्व गोष्टी मोठ्या प्रमाणात आहेत किंवा मोठ मोठ्या प्रमाणात केल्या जातात असं. राज्याचे क्षेत्रफळ मोठे, ईमारती मोठ्या, लोकांची घरे मोठी, रस्ते मोठे, तशीच रहदारी पण मोठीच आहे. इथे घनदाट झाडे असणारी जंगले आणि त्यात रहाणारे पशु पक्षी पण मोठ्या प्रमाणात आहेत.

बऱ्याचदा लोकांनां वाटते की टेक्सास मध्ये सर्व लोकं घोड्यावर स्वार होउन आणि "काउबॉईजची" टोपी घालुन, ईईईईईहाऽऽऽ असं काही म्हणत प्रवास करत असतील. पण ते पुर्वी करत असावेत, आता फार कमी प्रमाणात असे घोडेस्वार तुम्हाला दिसतील. राज्य मोठे असल्यामुळे, इथे सर्व गोष्टी इतक्या दुर दुर आहेत की कुठही जाण्यासाठी गाडी शिवाय पर्याय नाही आणि आपल्या भारता सारख्या बस, रिक्षा किंवा मेट्रो पण नाहीत. अहो साधं बाजारातुन म्हणजेच सुपर मार्केट मधुन कोथिंबीर जरी आणायची म्हंटली तरी स्वताःची गाडी पाहीजे किंवा उबर टॅक्सी करा. आता रोजरोज उबर कोण करणार आणि ती खिशाला तरी कशी परवडणार ना. म्हणून मी सुद्धा टेक्सास मधे आल्या आल्या पहिले काम गाडी विकत घेण्याचे केले.

जसे मी आधी सांगितलं की इथले रस्ते मोठे व रहदारी पण खुप आणि त्यांवर कहर म्हणजे सर्वजण अशी गाडी चालवतात जसं काही फॅारमुला वनची रेसच सुरू आहे आणि प्रत्येकजण आपण मायकल शुमाकर आहोत अशा पद्धतीने गाडी भन्नाट चालवत असतात. स्पीड लीमीट हे नुसते शोभे पुरतां आहेत. सत्तर माईल्सचे लीमीट असेल तरीही ऐंशी, नव्वद अगदी शंभरच्या वर वेगाने गाड्या सुसाट पळवतात. तुम्ही जर का रस्त्यांने गाडी हळू चालवली तर तुम्ही टेक्सासचे नाहीच असे माणुन, दोन तीन वेळा तरी हॅार्न ऐकु येयील. आता खोटे का बोलावे, टेक्सास मधे राहता राहता, मला सुद्धा स्वताः मायकल शुमाकर समजुनच गाडी चालवण्याची सवय झालीये. माझ्या जीवनात चालु असलेल्या रॅट रेस मध्ये, ह्या रेसिंग ची सुद्धा एक भर पडली होती.

मी काम करत असलेल्या, माझ्या नोकरीचे कार्यालय, हे माझ्या अपार्टमेंट पासुन मोजून वीस ते पंचवीस मिनीटाच्या अंतरावर होते. कदाचित तुम्ही विचार करत असाल, की अरे बाबा, नक्की वीस की पंचवीस? अहो, ते त्या दिवशीच्या रहदारीवर अवलंबुन असते. म्हणूनच घरातून बाहेर पडतांना मी नेहमी रहदारी फोनवर चेक करूनच बाहेर पडतो. आमच्या कंपनीमध्ये एक कडक नियम आहे, "आठच्या आत दारात" म्हणजेच सकाळी आठ वाजायच्या आधी "क्लॅाक ईन" करणे अनिवार्य, नाहीतर लेट मार्क लागतो व पगार कट होतो. आता तुम्हाला तर माहितीच आहे, माझ्या सकाळी लवकर उठण्याचे प्रताप. इथे तर माझे आई व पप्पा पण नाहीत, मला सकाळी लवकर ऊठवायला. आधीच काहीवेळा लेटमार्क लागला असल्यामुळे, माझी सकाळी लवकर उठण्याची सवय लावण्याचा माझा प्रयत्न, अजुनही चालुच आहे असंच म्हणणे योग्य ठरेल.

अश्याच एका सकाळी, साखरझोपेतुन जाग येऊन, माझा एक डोळा कसाबसा उघडला आणि दोन तिन "अंगडाई" देत डोळे चोळत उठलो. दररोज उठल्यावर जी गोष्ट सर्वात आधी करतो ती केली, म्हणजेच सोशल मिडिया चेक करण्यासाठी, फोन सुरू केला. कुणाचे मेसेजेस, ई-मेल, व्हाट्सॲप पाहता पहा, नजर गेली घडाळ्यावर. पाहतो तर काय, सव्वा सात वाजलेले. अरे अलार्म कसा वाजला नाही?, या शंकेने म्हणून चेक केलं तर मीच तो अलार्म, झोपेत असतांना, चार वेळा "स्नुजचे बटन" दाबून बंद केलेला दिसला. आजपण लेट मार्क नको म्हणून मी खाडकन उठलो. पटापट तयारी करत, दात घासुन झाल्यावर, आता अंघोळ संध्याकाळीच करू असे म्हणत, देवाच्या नावाचे म्हणून पाण्याचे चार थेंब अंगावर शिंपडुन घेतले. भरपुर असा बॅाडी स्प्रे मारत मारतच, पायात शुज घातले आणि गाडी कडे जायला घाईघाईने निघालो. जास्त उशीर होऊ नये म्हणून गाडी

भिन्नाट पळवत निघालो. नेहमीचाच तो रस्ता पण आज रहदारी बर्यापैकी होती. गाडी मध्ये ए. आर. रहेमानची गाणी सुरु होती. उशीर झाल्यामुळे माझे लक्ष वारंवार घड्याळाकडे जात होते. त्यातच कोणीतरी त्यांची गाडी माझ्या लेन मध्ये घुसवली व माझ्या पुढे हळुहळु चालवु लागले. ते बघुन, माझा थोडा संताप झाला व तोंडातून आपोआप त्यांच्या माता व बहीणीनां साष्टांग नमस्कार निघाले. कसेबसे करत हायवेच्या रस्तातुन एक्झिट घेतला आणि आजुबाजुला भरपुर झाडी असलेला अन् कमी रहदारीचा रस्ता सुरू झाला.
एका डोळ्याची नजर, गाडी चालण्यावर आणि दुसऱ्या डोळ्याची नजर घडाळ्याच्या काट्यावर, असं करत गाडी वेगात चालवत होतो. बाहेर थंडगार वारा सुटलेला, आजुबाजुला सुंदर हिरवीगार झाडी आणि रंगबेरंगी फुलपाखरे व पक्षी उडत होते. पण माझे सारे लक्ष, त्या लेट मार्क नको च्या नादात म्हणून घडाळ्यावरच होते.

अचानक् समोरून काहीतरी जोरात पळत आले अन् न कळताच माझा पाय ब्रेकवर गेला. सुसाट जाणारी गाडी, धस्सकुन थांबली. मी पण त्या धक्क्यातुन सावरत सावरत, वर चिडून समोरुन काय आले ते बघण्यासाठी मान वर करुन खाली पाहिले. पाहतो तर काय, समोर होते एका हरणाचे छोटे पिल्लू . थोडेसे घाबरलेले व गांगरलेले दिसत होते. भले मोठे डोळे करुन आणि कान टवकारून माझ्याकडे नजर रोखुन पहात होते. त्या गोंडस पिल्लाला पाहुन माझा सगळा राग तेव्हाच विरघळून गेला. बराच वेळ ते सतत टक लाउन माझ्याकडे पहात होते. जणुकाही त्याला मला काही सांगायचे होते.

श्रीकृष्णाने जसा महाभारतात वेळ काल थांबवून, जीवनाचे रहस्य ऊलगडणारी भगवतगिता सांगितली तसाच तो क्षण मला भासत होता. कदाचित ते पिल्लू सुद्धा मला सांगत होते की अरे हळु जरा, कसली ती घाई आणि कुणासाठी? कदाचित ते म्हणत होते की... ऐक जरा...

या दगदगत्या शहरात, थांब थोडे क्षण |
अनुभव हे जीवन, दिनरात, अगदी मनभरून ||
जग हे जीवन मोकळेपणाने, एकदम बिंद्धास्त |
सर्वच दिसतात आजकाल, संतापलेले व त्रस्त ||
एकच क्षण लागतो फक्त, होत्याचं नव्हतं व्हायला |
जीवनही कमी पडेल, हे जीवन जगायला ||
विसरशील हे जग, ही माणसेही विसरशील |
स्वताःस विसरु नको, ह्याची काळजी मात्र घेशील ह्याची काळजी मात्र घेशील ||

अचानक कुठल्याश्या आवाजाने ते पिल्लू दचकले आणि तिथून टुनटुन ऊड्या मारत पळून गेले. एकही शब्द न बोलताच ते मला खुप काही सांगुन गेले होते. मी पण त्या क्षणातून सावरत, गाडी हळूहळू चालवत निघालो. कामावर पोहोचल्यावर, काही वेळ मी त्या क्षणाचाच विचार करत बसलो. कामावर जायला उशिर झाला म्हणून मला बिलकुलही राग नाही आला कारण लेट मार्क मिळणे म्हणजे काही जीवनाचा शेवट नाही. पण तोच लेटमार्क न मिळावा म्हणून मी बाकी कसलाही विचार न करता, जोरात गाडी चालवत होतो. जर का त्या हरणाच्या पिल्ला ऐवजी एखादे दुसरे वाहन असते आणि काही अपघात झाला असतां तर काय उपयोग त्या घाईचा. अगदी त्या हरणाच्या पिल्लाला जरी काही ईजा झाली असती तरी मला खुप दुःख झाले असते.

ह्या लेटमार्क किंवा ही रॅट रेस च्या नादात, मी खऱ्या जीवनाचा आंनद घ्यायचेच विसरून गेलेलो. खरंच आहे की, आपण ह्या कामाच्या व्यापात ईतके व्यस्त होऊन जातो की कामाचा आंनद घेण्याऐवजी त्याचा टेन्शन घ्यायला लागतो. काम व बाकी जीवनाचा संतोलन राखणे हे आजच्या युगात खुप महत्वाचे झालेय. त्या एका क्षणात मी जे अनुभवले, त्यातुन बोध घेत नुसते रॅट रेसच्या मागे न लागता, माझ्या जीवनाचा जो काही हेतु आहे तो शोधून, जीवनाचा आनंद घेत आहेत, ते साकारण्याचा प्रयत्न करायला हवा.

लहानपणा पासुन आपण कसलाही विचार न करता नुसते धावतोय. एक गोष्ट झाली की दुसरी मिळवण्यासाठी नुसते पळत सुटलोय. पण काही केल्या समाधान नाही होत. नेहमी काहीनाकाही हवेच असते. आपला जन्म ह्या जगाच्या पाठीवर नक्की का झालाय अन् त्याचे तात्पर्य तरी काय, हे समजुन घेणे तितकेच महत्वाचे आहे. त्या दिवसा नंतर मीही तसाच काही प्रयत्न करतोय. संपुर्ण आयुष्यात ज्याचा बोध मला नाही झाला पण “तो एक क्षण” मला खुप काही शिकवून गेला.

**लेखक: श्री मनोज सोनजे**

# DROPLET

In my room, nowhere to go,
Staring at the droplet on my window.
Unlike me, it can explore,
the cause of a problem, the root of a war
Its transparent self gleams in the light,
But when the sun comes out, it starts to hide
"No, little droplet!" I wanted to shout,
“Ignore the sun, please come out”.
"My journey is over." It starts to say.
“Replace me, my friend." then it fades away
I look transparent in the night.
I needed to explore, far and wide,
And now I adventure everyday.
And I will go through, come what may.
And when clouds of rain replace the sun
I start to whisper, "Go little droplet, go.
Your journey is never done.“

Poet: Ms. Aryaa Phadke

# पप्पू चित्त्याचे कारनामे



नुकतेच चित्त्यांचे भारतात पुनःश्च आगमन झाल्याची बातमी कानावर पडली, किंबहुना हल्लीच्या सामाजिक माध्यमांच्या युगात ‘बातमी कानावर पडली’ म्हणण्याऐवजी बातमीचा भडिमार झाला म्हणणे जास्त योग्य ठरेल.

असो, पण मुद्दा तो नाही. तर ह्या चित्ता परिवाराच्या भारत आगमनाच्या वार्तेनी मला मात्र माझ्या ४०-४५ वर्षापुर्वीच्या बालपणाच्या आठवणीत नेले व बालपण दे गा देवा ही ओळ आठवली.

आपल्या भारताला ऐतिहासिक आख्यायिका व दंतकथैंचा एक अमूल्य वारसा लाभला आहे अन् हा वारसा पिढी दर पिढी पुढे चालत आला आहे, निदान माझ्या बालपणी म्हणजे सत्तरी व ऐंशीच्या दशका पर्यंत तरी नक्कीच!

आम्हां दोघा भावंडांच्या सुदैवाने आम्हाला आजोबा-आजी ही अशी लाभली ज्यांचे आयुष्य लहान मुलांमध्येच गेले. वडिलांकडिल आजोबा स्वातंत्र्यपूर्व काळापासून टिमरणीच्या माध्यमिक शाळेचे प्रधानाध्यापक तर आई कडिल आजोबा-आजी दोघेही स्वातंत्र्य सेनानी व अकोल्याची सर्वात पहिली बाळवाडी अभिनव बाळ शाळेचे जनक. दुर्दैवाने वडिलांच्या आईचे माझ्या जन्मापुर्वीच देहावसान झालेले त्यामुळे कमळाआजी फक्त काही जुन्या फोटोंतून व वडिलांच्या आठवणीतूनच आम्हाला ठाऊक. पण त्या तिघा आजी-आजोबांकडे ऐतिहासिक व दंतकथे बरोबरच त्यांच्या स्वतच्या आयुष्यातील आठवणींचा एव्हढा मोठा संग्रह असायचा की आम्हां भावंडांची उन्हाळ्याच्या सुटीचे दोन महिने रोज रात्री झोपतांनाच्या नविन गोष्ठीची अगदी सहज सोय व्हायची.

साहजिकच आजी-आजोबांच्या या रोज नविन गोष्ठ गुंफण्याच्या कलेचा वारसा आमच्या आई-वडिलांकडे आपसुकच आला. तसे पाहता वडिल भारतीय रेल्वेच्या अभियांत्रीकी विभागात कार्यरत, त्यामुळे आठवड्यातील ३-४ दिवस फिरतीवर व आम्हा दोघांची रात्रकालीन गोष्ठ या बालवयीन गरजेची शांत करायची जबाबदारी आई वरच असायची, पण ज्या दिवशी वडिल घरी असायचे, ते दिवस बाबांच्या गोष्ठींसाठी राखीव असा अलिखित नियमच जणू. अन बाबांच्या गोष्ठीतलं असंच एक नेहमीचं कथानक म्हणजे “पप्पू” चित्ता अन त्याचा परिवार.

महाराष्ट्रापासून दूर अनोळखी बिहार (आताच्या झारखंड) प्रांतात राहणाऱ्या आमच्या मराठी परिवारांप्रमाणेच या “पप्पू” चित्त्याचा परिवार पण बिहारच्या त्या छोट्याश्या चक्रधरपूर या गावात राहात असे अन आमच्या परिवाराप्रमाणेच “पप्पू” चित्त्याच्या परिवारात देखील माझ्या लहान भावाप्रमाणेच पप्पूची ‘आई’ चित्ता, ‘बाबा’ चित्ता व ‘दादा’ चित्ता असे.

थोडक्यात, आम्हां दोघा भावंडांच्या दैनंदिनीत जे काही घडत असे, तेच सर्व रात्री “पप्पू” चित्त्याच्या गोष्ठीतही घडे अन आम्हा भावंडांच्या अल्पबुद्धी मेंदूंना याचे खूप नवल व आश्चर्य वाटे. माझ्या भावाला सुरवातीला शाळेत जाण्याचा अतिशय उबग असायचा, शाळेची वेळ झाली की याच्या पोटात दुखायला लागलेच म्हणून समजावे, तर त्या दिवशी रात्रीच्या गोष्ठीत आवर्जुन लहानग्या “पप्पू” च्या पोटात दुखलेले असायचे.

शाळेनंतर आम्ही मित्र-मैत्रीणी गप्पा टाकत व हसत खेळत नेहमीच्या रस्त्यानी घरी परतायचो, एके दिवशी आम्ही सर्वांनी नेहमीचा रस्ता न धरता दुसरा थोडा लांबच्या रस्ता घेतला अन् रोजच्या १५ ऐवजी घरी पोचायला ३०-३५ मिनिट लागलीत, झालं घरी आल्यावर आईनं धूधू धुतला अन मागच्या ओसरीतल्या कोपऱ्यात असलेल्या संडासात तासभर कोंडून राहण्याची शिक्षा प्राप्त झाली.

साहजिकच रात्री कानी पडले की आज पप्पूच्या 'दादा' ला पण आईनी बेदम चोपला व संडासात कोंडून ठेवला होता. त्यानी म्हणे आईची माफी मागत पुन्हा असं नाही करणार असा प्रण केला तेव्हा त्याची सुटका झाल्याचे कळलं.

तर असा हा पप्पू चित्ता व त्याचा परिवार आमच्यासाठी नुसती एक काल्पनिक कथा न राहता आमच्या त्या खट्याळ बालमनाचे प्रतिबिंबच जणू. पण बऱ्याच प्रसंगी ते नुसते प्रतिबिंब न राहता आम्हा भावंडांना एक आदर्श म्हणूनही कामी पडत.

अश्याच एका प्रसंगी वडिलांना ऑफिसमध्ये काही आकस्मिक कामामुळे उशीर झाला. आम्ही दोघं भावंडं नेहमीप्रमाणे जेवणं आटपून व वडिलांची वाट बघत कधी निद्रेच्या कुशीत शिरलो ते माहीत नाही, पण रात्री एक-दीड वाजताच्या सुमारास कधीतरी आईने न राहवून मला उठवले व बाबांच्या काळजीने पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणली "दादा, अरे रात्रीचे दीड वाजलेत, पण बाबा अजून आले नाहीत!" आजच्या स्मार्ट फोन अन २जी-५जी च्या युगात ही एक क्षुल्लक गोष्ठ असेल ही कदाचित, पण सत्तरीच्या उत्तरार्धात घरात जेव्हा लँडलाईन असणे ही गर्भ-श्रीमंतीचे सूचक असायचे, रात्री दीड वाजता कुणाला कसा निरोप पाठवायचा अन काय करायचे हा एक मोठ्ठा प्रश्न असायचा.

तर या अश्या कातरवेळी, मला नेमकी पप्पू चित्ताची कुठली तरी मागे झालेली गोष्ठ आठवली, पप्पूचे बाबा घरी नसताना पप्पूचा दादा कशी आईला मदत करतो अन शूर शिपाई बनून आईला आधार देतो.

मग काय, माझ्या त्या ५-६ वर्षाच्या बालमनात पण शुर शिपाई जागा झाला. बाबांचे एक सहकारी आमच्याच रेल्वे कॅालनीत रहात असत, पटनायक अंकल त्यांचे नाव, पण त्यांचे घर आमच्या घरापासून साधारण दीड-दोन किलोमिटरवर, त्यामुळे आईची चलबिचल दोन लहान पोरांना घेवून अंधाऱ्या रात्री येवढ्या लांब चालत जायचे कसे. बास्स, इथे माझ्यातला दादा चित्ता पुरता पेटला, मी आईला म्हटलं, तू घरी थांब, अमित झोपला आहे, मी हा गेलो अन अंकल ला घेऊन आलो. आईने नाईलाजाने शेवटी मला हो म्हंटले अन् मी निघालो.

निघालो खरा, पण थोडी पावलं चालतो न चालतो तर त्या अंधाऱ्या रात्रीने पुरते धाबे दणाणले. सत्तरीतलं ते झारखंड मधील छोटसं गाव, धड रस्ते ही नसलेलं, रस्त्यावरच्या खांबावर जेमतेम खांबाच्या पायथ्याशी प्रकाश पडेल असे मिणमिणत्या वॅटेजचे बल्ब, काही खांबावरचे बल्ब आम्ही चिल्लर कंपनीने दिवसा नेमबाजी पक्की करत दगडं मारून फोडलेले! त्यावेळी मनात कुठेतरी हा निर्धार केला, रस्त्यावरचे दिवे पुन्हा नाही फोडणार! आमच्या घरामागे कॅालनीची मोठी पाण्याची टाकी होती, रात्रीच्या किर्र अंधारात त्या टाकीत पाणी पडतानाच्या विचित्र आवाजाने अंगावर काटा येत होता, त्यात रातकिड्यांची आपली एक वेगळीच स्वरसाधना. मग मध्येच मला आम्हा मित्रांच्या गप्पांतून ऐकलेला 'डंडा-बुढ्ढा' हे पात्र आठवले, मग काय माझी पावलं चालणे व धावणे यांच्यातली सीमा विसरलीत.

खरे तर आता हे डंडा-बुढ्ढा पात्र आठवले की खुप हसायला येतं, पण त्या काळी मात्र त्या शब्दांनी सुध्दा अंगावर शहारा यायचा. तर हे डंडा-बुढ्ढा म्हणजे दुसरं तिसरं काही नाही, आमच्याच कॅालनीत राहणाऱ्या एका काकांचे वयोवृध्द वडिल होते, ८०-८५ वय असेल पण शरीरयष्टी एकदम भारदस्त, ६ फुटाच्या आसपास उंची, मोठ्या मिश्या, चेहऱ्यावर वयानुसार एक तिरसट हावभाव, एकदम कडक ताठ चालणे, पांढरा कुर्ता पांढर धोतर हे नेहमीचं परिधान अन चालताना हातातली काठी, काठी कसली दणकत असा दांडूकाच तो, प्रत्येक पावलानिशी रस्त्यावर आदळत चालणे. वास्तविक पाहता त्यांनी आम्हा बच्चा कंपनीला कधीच रागावलं नाही का ओरडलं नाही, पण त्यांचा एकंदर आविर्भाव बघूनच आम्ही बिथरायचो, दुरून काठीचा आवाज ऐकला रे ऐकला की आमच्यातला कुणीतरी लांडगा आला रे आला च्या धर्तीवर डंडा-बुढ्ढा आया अशी आरोळी ठोकायचा अन दुसऱ्या क्षणी सर्व आपआपल्या घरी धूम ठोकायचे.

तर अश्या सर्व मानसिक चलबिचलतेतनं अन रामरक्षा-मारूति स्तोत्र पठन करत मी शेवटी गाठलं पटनायक अंकल चे घर अन त्यांनी दार उघडेस्तोवर जीव मुठ्ठीत धरून कडी वाजवत बसलो. त्यांचेही धाबे दणाणले, रात्री १.३० वाजता ६ वर्षाचं लहान पोरगं एकटच अंधाऱ्या रात्री २ किलोमिटर चालत आलं, त्यांनी लगेच कपडे चढवले, सायकल काढली अन मला बसवून आमचे घर गाठले. मला घरी सोडून अंकल तशेच ऑफीसला जाऊन वडिलांचा निरोप घेऊन आले, वडिलांना काहीतरी ईमरजंसीमुळे त्या रात्री काही घरी येणे जमणार नव्हते. दुसऱ्यादिवशी कॅालोनीभर माझ्या पराक्रमाची चर्चा, पण मला मात्र त्या रात्रीचा प्रसंग अन प्रसंग आठवून त्या पप्पूच्या दादाला शिव्या द्यायची ईच्छा होत होती.

तर अश्या सर्व आठवणींनी भरलेलं माझं आणि माझ्या लहान भावाचे बालपण हे चित्ता या प्राण्याशी एका वेगळ्याच नात्यात गुंफलं गेलेलं, पुढे, कधीतरी कानी पडले चित्ता ही प्रजाति भारतातल्या जंगलातून विलुप्त झाली, ती बातमी मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात चटका लावून गेली, आपल्या जवळचे, किंबहुना परिवारातलेच सदस्य हरपले या विचाराने काही क्षण एक विलक्षण खिन्नता वाटून गेली.

आता कित्येक वर्षानी भारतात चित्त्यांचे पुनरागमन झाल्याची खबर त्या सर्व गोड आठवणी पुन्हा जाग्या करून गेली. पप्पू चित्ता पुन्हा एकदा आपल्या निष्पाप खट्याळपणाने भारताच्या कुठल्यातरी कानाकोपऱ्यात अनेक बालपण अशीच घडवत राहो.

**लेखक: श्री. सुजित तेलंग**

# कलादालन





**चित्रकार: सौ. कांचन महंते**
**साधन: निब पेंटिंग**

‘कांचन चाफेकर’ म्हणजे आताची ‘कांचन महंते’ ही माझी शाळेतली वर्गमैत्रिण. गेली १७ वर्षे ती 'Nib Painting' ही एक अनोखी आणि अद्‌भुत प्राचीन कला जोपासत आहे. तळहातावर ॲक्रेलिक रंग घेऊन पेनाच्या निबने कॅनव्हासवर चित्र काढण्याची ही कला आहे. तिने अशी असंख्य चित्रे (गणपती बाप्पा, बुद्‌ध मुद्रा इ.) काढली आहेत. आतापर्यंत, तिच्या चित्रांची भारतात जवळपास ५० प्रदर्शने झाली आहेत. मुंबईत तिचा स्वतःचा स्टुडिओ आहे.

*- श्री. लक्ष्मीकांत चंद्रकांत बोन्द्रे*

# पाककृती - गुलाब चिरोटे

## गुलाब चिरोटे

### साहित्य

- १ वाटी मैदा
- १/२ वाटी पिठीसाखर
- १ टेबलस्पून गरम तेल
- ३ ते ४ टेबलस्पून तूप
- ५ टेबलस्पून कॉर्नफ्लोअर
- १ टीस्पून rose essence
- चिमुटभर मीठ
- १/२ वाटी पाणी मैदा भिजवण्यासाठी
- तेल तळण्यासाठी
- लाल, पिवळा व हिरवा फूड कलर

### कृती

1. एका भांड्यात मैदा, मीठ व गरम तेल घालून चांगले मिक्स करून पीठ मऊसूत मळून घेणे.
2. मळलेल्या पिठाचे तीन समान भाग करून घेणे त्यातील एका भागात लाल कलर, एका भागात पिवळा आणि एका भागात हिरवा कलर घालून पीठ परत चांगले मळून घ्या
3. मळलेले पीठ अर्धा तास झाकण लावून सेट व्हायला ठेवून द्यावे. दोन चमचे कॉर्नफ्लॉवर मध्ये दोन चमचे तूप घालून मिश्रण नीट मिक्स करून साटा तयार करून घ्यावा.

© 2010 Vertex42.com


5. प्रथम पिवळ्या रंगाची पोळी घेऊन त्यावर कॉर्नफ्लॉवर चे साटे सगळीकडे पसरवून घ्या व त्यावर लाल रंगाची पोळी ठेवून त्यावर साटे लावून त्यावर पुन्हा हिरव्या रंगाची पोळी ठेवून घ्या व साटे लावून घट्ट रोल करून घ्या.
6. या रोलचे एक इंचाचे काप करून घ्या. तयार कापाची लेअरची बाजू वर करून पुन्या लाटून घ्या.
7. पुन्या मध्यम आचेवर कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या.
8. तयार चिरोट्यावर rose essence व पिठी साखर भुरभुरून घ्या. गुलाब चिरोटे तयार



© 2010 Vertex42.com

पाककृती- सौ. चारुता देशपांडे भागवत

# छोट्यांच्या लेखणीतून (मराठी शाळा विद्यार्थी)



मराठी शाळेच्या मुलांना आपले लेखन कौशल्य दाखवण्याची संधी दिल्याबद्दल महाराष्ट्र मंडळाला आणि दिवाळी अंकाचे संपादक श्री लक्ष्मीकांत बोन्द्रे यांना धन्यवाद.

या दिवाळी अंकासाठी आम्ही मुलांना त्यांच्या आवडीचा विषय निवडायला सांगितला होता. वेगवेगळ्या इयत्तेमधील विद्यार्थ्यांचे हे प्रयत्न आहेत - अगदी चिल्लीपील्ली पासून ते दुसरी पर्यंतची ही मुले. विषय त्यांचे, विचार त्यांचे, आणि लिखाणही त्यांचेच.

त्यांनी इंग्लिशमध्ये आधी लिहावे आणि नंतर जमेल तसे (त्यांच्या इयत्तेनुसार) मराठीत भाषांतर करावे असे आम्ही सुचवले होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आई-वडिलांची, शिक्षकांची आणि गुगलची मदत घेण्याची परवानगी होती.

वाचकहो, आपल्या मुलांचे हे प्रयत्न त्यांच्या उत्साहाचे आणि मराठी भाषेविषयीच्या प्रेमाचे प्रतीक आहे. त्यांचा हा उत्साह आणि मराठी-प्रेम वाढविणारे आमचे शिक्षक आणि आई-वडील यांचाही इथे सिंहाचा वाटा आहे.

आमचा हा प्रयोग किती यशस्वी झाला आहे ते तुम्हीच आता ठरवा.

**श्री. राजेंद्र कुलकर्णी (राजूकाका)**
**शाळा मुख्याध्यापक**




## ध्रुवीय अस्वल

आपण कधी ध्रुवीय अस्वलांबद्दल विचार केला आहे का? ते मोहक आणि आश्चर्यकारक प्राणी आहेत. या प्राण्याची ही काही तथ्ये, अन्न आणि निवासस्थाने आहेत.

ध्रुवीय अस्वलासाठी अनेक तथ्ये आहेत. आपल्याला माहित आहे काय की नर ध्रुवीय अस्वलाला डुक्कर म्हणतात आणि मादीला पेर म्हणतात. ध्रुवीय अस्वलास उरस आर्क्टोस म्हणून देखील ओळखले जाते. प्रौढ नराचे वजन सुमारे ३५०-७०० किलो असते. सर्व ध्रुवीय अस्वलांत अनेक मनोरंजक तथ्ये आहेत

ध्रुवीय अस्वल भरपूर अन्न खातात. सर्व ध्रुवीय अस्वल हायपरकार्निव्होर असतात. हायपरकार्निव्होर एक प्राणी आहे जो त्याच्या आहारासाठी ७०% मांस जास्त खातो. ध्रुवीय अस्वल बहुधा सील खातात, परंतु कधीकधी मासे खातात. प्रौढ अस्वल त्वचा आणि सीलचा ब्लबर खातात, बाळ अस्वल सीलचे लाल मांस खातात. हे प्रौढ आणि तरुण अस्वलांसाठी आहार आहेत.

ध्रुवीय अस्वल अनेक ठिकाणी राहतात. त्याचा पसंतीचा अधिवास म्हणजे वार्षिक समुद्री बर्फ. ते ध्रुवीय पात्रात किंवा उत्तर ध्रुवात राहत नाहीत, कारण सीलची संख्या कमी आहे. जेथे समुद्र बर्फाला स्पर्श करतो तेथे त्यांचा कल असतो. या ठिकाणी ध्रुवीय अस्वल राहतात

आता आपल्याला ध्रुवीय अस्वलांबद्दल सर्व काही माहित आहे. आपल्याला त्यांची माहिती, आहार आणि ते कोठे राहतात हे माहित आहे. आपण आश्चर्यकारक आणि भव्य आहात.


**कु. विहान दाणी**
**(इयत्ता: सिनिअर दुसरी)**

## माझ्या आवडत्या पुस्तकाची एक छोटीशी झलक

'इनहेरिटन्स गेम्स' हे जेनिफर लिन बार्न्स यांचे पुस्तक आहे, जे कोडी आणि फसवणुकीचे मास्टर आहेत (न्यूयॉर्क टाईम जर्नलने म्हटल्याप्रमाणे). पुस्तक वर्तमानात आणि आमच्या मुख्य पात्र Avery Kylie Grambs च्या आसपास सेट केले आहे. ती लहान असतानाच तिची आई वारली आणि तिचा जन्म झाल्यावर तिचे वडील तिला आणि तिच्या आईला सोडून गेले. ती 14 वर्षांची असताना तिच्या सावत्र बहिणीने तिचा ताबा घेतला होता आणि तिच्या बहिणीसोबत तीने आयुष्य जगले. शाळेत एके दिवशी तिला प्रिन्सिपलच्या कार्यालयात बोलावले जाईपर्यंत सर्व काही ठीक चालले होते आणि तिला सांगण्यात आले की तिला टोबियास हॉथॉर्नच्या इच्छापत्र वाचनासाठी बोलावण्यात आले आहे. ती त्या माणसाला कधीच भेटली नव्हती, पण काही तासांच्या संशोधनानंतर तिला कळले की तो खूप यशस्वी व्यापारी आहे. कोट्यवधींचा वारसा मिळण्याचे भाग्य त्यांना मिळाले. जेव्हा ती टेक्सासला गेली (जेथे तो राहत होता) तिने आधीच त्याचे कुटुंब पाहिले. सगळ्यांनी तिला सांगितल्याप्रमाणे त्यांचं घर खूप मोठं होतं. सर्वजण इच्छापत्र वाचायला बसले आणि वाचायला सुरुवात केली तेव्हा सर्वांना कळले की टोबियास हॉथॉर्नने जवळजवळ सर्व काही एव्हरीला दिले होते आणि त्याच्या कुटुंबाला नाही! सर्वांचे तिच्याशी भांडण झाले होते. तिची बहीण उत्साही होती पण ती प्रत्येक गोष्टीवर संशय घेत होती. टोबियासच्या दोन नातवंडांना ही चिंतेची बाब वाटली. एकाला वाटले की ती एक चोर स्त्री आहे आणि तिने आजोबांना पैसे देण्यास फसवले होते. दुसऱ्याला खात्री पटली की ती त्याची शेवटची आवडती गोष्ट आहे. मी तुम्हाला सांगायला विसरले होते की टोबियास हॉथॉर्नला विनोद आणि कोडे आवडतात, म्हणूनच संपूर्ण हवेली गुप्त प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या मार्गांनी व्यापलेली आहे. मग तिचा ह्या सगळ्याशी काही संबंध आहे की ती फक्त एक फसवाफसवी करणारी स्त्री आहे? ती काहीही असो, तिला किंवा घरातील इतर कोणाला मारण्यापूर्वी त्यांनी ते शोधून काढले पाहिजे.

**कु. ध्रुवी भागवत**
**(इयत्ता: सिनिअर दुसरी)**




माझी कुत्री — आर्नन देसाई

माझ्या कुत्रीचे नाव बेला आहे. तिचा रंग काळा आहे. ती टॉय पूडल जातीची आहे. तिचे वजन दहा पाऊंड आहे. ती सहा वर्षांची आहे. मी जेव्हा तिला आणले तेव्हा ती आठ आठवड्यांची होती आणि मी अडीच वर्षांचा होतो. ती खूप गोड आहे. तिला पोटाला गुदगुल्या केले त्या आवडतात. तिला फिरायला जायला आवडते. पूर्वी बेला आजारी पडत असे. तिच्या आजारामुळे तिच्या अंगावरचे केस लहान आहेत. आम्ही सगळे बेलावर प्रेम करतो. बेला आमच्यावर प्रेम करते.

**कु. आर्नन देसाई**
**(इयत्ता: सिनिअर पहिली)**



# माझे आवडते पुस्तक: हॅरी पॉटर - III

माझे आवडते पुस्तक हॅरी पॉटर-III

हॅरी पॉटर हे एक जादूच्या शाळेबद्दलचे पुस्तक आहे आणि म्हणूनच मला ते फार आवडते.

त्यात जादूसाठी एक शाळा आहे त्याला हॉगवर्ट्स म्हणतात.

माझ्यासाठी पुस्तकातील सर्वात मजेदार भाग म्हणजे जेव्हा हॅरी त्याच्या आत्याला जादूने एका फुग्यासारखं फुगवतो कारण त्याची आत्या त्याच्यासाठी जगातील सर्वात वाईट व्यक्ती आहे. मग तो

दुसऱ्या दिवशी हॅरी काही जादूची पुस्तके आणण्यासाठी दुकानात गेला आणि मग काहीतरी नवीन त्याच्या नजरेत पडले. ते एक जिवंत पुस्तक होते. हॅरीला ती पुस्तके मिळाल्यानंतर, तो जादू शिकू शकणार होता. म्हणूनच त्याला जादू शिकता येऊ नये यासाठी त्याचे गुंड मित्र त्याची पुस्तके काढून घेण्याचा प्रयत्न करत होते. त्यानंतर हॅरीला एका शूरवीराने पकडले आणि तो खूप चांगला होता. त्याने हॅरीला त्याला जिथे जायचे

दूरवर असलेल्या एका जादूच्या शाळेत जाण्यासाठी त्याच्या घरातून निघतो आणि बसने जातो.

त्यानंतर त्यांनी बस चालकाशी चर्चा केली आणि काही तासांनंतर ते जादूची शाळा असलेल्या ठिकाणी पोहोचले. मग त्याला काही जुने मित्र दिसले जे आता त्याच्यावर हेरगिरी करत आहेत.


त्यामुळे आता त्याची अडचण झाली आहे.

होते ते ठिकाण शोधण्यात मदत केली जे त्यांच्या देशाबाहेर होते आणि त्या ठिकाणाला 'अॅज्कबॅन' म्हटले जाते.


कु. सोहम बोन्द्रे
(इयत्ता: सिनिअर दुसरी)



## फेन्सिंग


फेन्सिंग — इला

फेन्सिंग हा खेळ माझ्या जीवनाचा एक मोठा भाग झाला आहे. मी फेन्सिंग २०१९ मध्ये सुरु केले. तेव्हा जरी मी स्पर्धेत भाग नव्हती घेत, तरी मला खूप मजा येत असत. मग सहा महिन्यात २०२० मध्ये अमेरिकेत कोविड आले. माझा फेन्सिंग क्लब पूर्ण पणे बंद झाला. जेव्हा फेन्सिंग पुन्हा सुरु झाले, तेव्हा मी पाचवित होते. माझे ब्रॉन्झ टीम मध्ये दाखला झाला. मी आठवड्यातून दोन दिवस सरावाला जाऊ लागले. मला मंगळवार - गुरुवार सरावाची भिती वाटू लागली. मी स्पर्धेत भाग घेऊ लागले.


मी ब्रॉन्झ टीम मध्ये एक वर्ष होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत देखिल मी सरावाला जात होते. माझी जिद्द बघून, मी बारा वर्षे पूर्ण केले नसून माझ्या कोचनी मला सिल्वर टीम मध्ये टाकले. मी आठवड्यातून तीन दिवस सरावाला जाऊ लागले. मी अनेक मित्र बनवले. मी पूर्वीपेक्षा जास्त आवडीने फेन्सिंग करायला लागले. माझ्या खेळात मी बरीच सुधारणा दाखवली. मी अनेक स्पर्धांमध्ये पदके जिंकली. फेन्सिंग क्लब आता माझ्या सगळ्यात आवडते ठिकाण बनले आहे.



**कु. इला कानसकर**
**(इयत्ता: जुनिअर दुसरी)**

## खार

मी खार पाहिली. मी तिचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला पण तिने माझा पाठलाग केला. मी पुन्हा प्रयत्न केला पण खारीने पुन्हा माझा पाठलाग केला. तेव्हा माझी आई म्हणाली तुला खारीची भीती वाटते.



**कु. चिन्मय पोळ**
**(इयत्ता: चिल्लीपिल्ली)**

# हॅलोवीन

घरोघरी सापळे,
दारोदारी भोपळे,
भूतं खेतं हडळीण.
आला आला हॅलोवीन.



पुढल्या दारी डेकोरेशन,
पिशाचांचे जणू अकोमोडेशन,
चॉकलेट कॅण्डीने भरलाय टीन,
आला आला हॅलोवीन.




कॉस्च्युममध्ये घुसा,
आणि चमत्कारिक दिसा,
भयानक किंवा डिव्हाईन,
आला आला हॅलोवीन.

ट्रिक ऑर ट्रीट, ट्रिक ऑर ट्रीट,
भटकत रहा प्रत्येक स्ट्रीट,
जोवर येत नाही क्षीण,
आला आला हॅलोवीन.


कवी - लंबोदर उर्फ श्री लक्ष्मीकांत बोन्द्रे

# दिवाळी फराळ - कोडे - उत्तर

*१. रवा लाडू*
*२. चकली*
*३. शंकरपाळी*
*४. करंजी*
*५. तिखट शेव*
*६. चिरोटा*
*७. चिवडा*
*८. बेसन लाडू*
*९. अनारसा*



# शब्दकोडे - महाराष्ट्रातील मंदिरे व धार्मिक स्थळे - उत्तर



## ।। जय शिवराय।।



चित्रकार: सौ. तेजश्री सौरभ मगदूम

For suggestions/ comments please feel free to write to samaharashtramandal@gmail.com
Find us on : www. http://sanantoniomaharashtramandal.org/
FaceBook Group: San Antonio Maharashtra Mandal
Instagram: samaharashtramandal